मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

म प्र

# हितगुज

अंक ७२ ❖ संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ❖ डिसेंबर २००७

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल: maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.) (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय भूमिका



संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे

प्रिय कुलबांधव आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार.

कुलदेवतेच्या कृपेने आपणा सर्वांना दिवाळी आनंदाची सुखाची मांगल्याची व भरभराटीची गेली असेलच. हितगुजचा हा अंक आपल्या हातात पडेल तेंव्हा दीपोत्सव संपून आपल्याला पहिल्या जागतिक चित्पावन महासंमेलनाचे वेध लागले असतील. हितगुजमध्ये वेळोवेळी दिलेल्या माहितीवरून आपल्या मराठे परिवाराने आगाऊ नोंदणी केली असेलच. हे संमेलन रविवार दि. २३ डिसेंबर २००७ रोजी चंद्रशेखर आगाशे कॉलेज, मुकुंदनगर, पुणे येथे संपन्न होणार आहे. जगभरच्या एक लाखावर चित्पावनांना एकत्र आणण्याचा संकल्प असलेले हे संमेलन यशस्वी करण्यासाठी आपण अधिकाधिक संख्येने सहभागी होणे अगत्याचे आहे. संमेलनाविषयी मराठी व इंग्रजीमध्ये अधिकृत व अद्ययावत तपशीलवार माहिती तसेच संपर्कविषयक सूचना

(पुढील मजकूर पृ.११ वर)

पुणे येथील २३ डिसेंबर २००७ च्या
पहिल्यावहिल्या जागतिक चित्पावन महासंमेलनानिमित्त खास लेख



## ब्राह्मण ज्ञाती संस्था

### आवश्यकता आणि भूमिका

-विनायक केशव मराठे (पृ.२०)

सी-४,स्वप्नसाफल्य, ॲनी बेझंट रोड, वरळी ,मुंबई ४०००२५; ✆: २४३०३३२९

ब्राह्मण ज्ञातीसंस्थांच्या स्थापनांना सुमारे ७० ते १०० वर्षे उलटून गेली. ब्राह्मण समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी या विविध संस्थांची उभारणी करण्यात आली. यापैकी काही संस्था समग्र ब्राह्मण समाजासाठी तर काही पोटजातींसाठी. तर कुलवृत्तांत निर्मितीसाठी स्थापन झालेल्या काही संस्था त्या त्या कुलांसाठीच असल्या तरी त्या सर्वांचा मुख्य उद्देश कुलबांधवांची उन्नती हाच आहे. काही अपवाद सोडले तर या संस्थांचा कारभार साधारणत: सत्तरीच्या आसपास रेंगाळणाऱ्या तरुण वृद्धांकडेच आहे.

बऱ्याच संस्थांच्या बाबतीत अगदी स्थापनेपासून तन मन आणि जरूर भासली तेव्हा धन समर्पित करून कार्यकर्त्यांनी या संस्था जगविल्या आणि विकसित केल्या. हे कार्य एका पिढीने नव्हे तर कमीत कमी दोन पिढ्यांनी केले. भारताच्या,किमान महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात गौरवाने नोंद करावी अशी ही उदाहरणे आहेत. पण दुर्दैवाने या 'नावडत्या समाजा'चे मीठ अळणीच असणार. असो. आपला सत्कार व्हावा, आपली नांवे लोकप्रिय व्हावीत असा विचार या खऱ्या खुऱ्या समाजसेवकांच्या मनात कधीच आला नाही, येणारही नाही. पै-पै जमा करून आणि एक एक माणूस जोडून त्या काळी सामान्यातल्या सामान्य माणसांनी या संस्था स्थापन केल्या व पोटच्या पोराप्रमाणे जतन केल्या. काहींनी आपापल्या कुवतीप्रमाणे लहानमोठ्या वास्तू उभारल्या. गरीब व निराधार विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत केली. उत्सव साजरे केले. सार्वजनिक मौंजीबंधनांसारखे उपक्रम आंखून संस्कार जिवंत ठेवले.

कालौघात अनेक मूल्ये वाहून गेली. कित्येक तट नाहीसे झाले. बंधन असे राहिलेच नाही. अश्या अवस्थेत या समाजसेवकांचे व्रत कोण पुढे चालविणार ?

या ज्ञातीसंस्थांची आवश्यकता व भूमिका या बाबतीत विचारमंथन होणे हे तरुण पिढीच्या दृष्टीने

(पुढील मजकूर पृ.४ वर)

❖ संपादकीय सहाय्य व अक्षरजुळणी : सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६) ❖

पत्रव्यवहाराचा पत्ता:(१) संपादिका:डॉ.सौ.सुमेधा प्र मराठे ८/१३,सहकार नगर, वडाळा-प. मुंबई ४०००३१; ✆ : २४१५०८८९

ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com

(२) सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९. ✆:२६८३६९९४

सेल-९८३३५६४२६८; ई-मेल :(1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in

# राजस्थानातील अनोखे 'अलवर'

लेखक -जयंत र. मराठे (पृ.५१०)
२१, गायत्री सोसायटी, २१५, पर्वती गांव, पुणे ४११००९; ✆:०२०-२४४४१११७

राजस्थानला जाण्याचा आमचा बऱ्याच दिवसांचा बेत अखेर अगदी थंडीचा कहर असलेल्या डिसेंबर महिन्यात पूर्ण झाला.आमच्या कन्येच्या व कर्नल असलेल्या तिच्या यजमानांच्या नियोजनानुसर प्रथम आम्ही अलवरला त्यांच्या घरी राहून तेथील परिसरातील प्रेक्षणीय स्थळे पाहून नंतर जयपूर, पुष्कर, चितोड इ. ठिकाणी जायचे असे ठरले. १५ डिसेंबरला आम्ही अलवरला पोहोचलो.

अलवरला तशी ऐतिहासिक किंवा पौराणिक पार्श्वभूमी आहे. इ.स.१५०० पूर्वी हा भाग मत्स्यदेश म्हणून ओळखला जायचा. विराटनगरचे राज्य या ठिकाणी त्या काळी विस्तारलेले होते. पांडवांनी आपल्या १३ वर्षांच्या वनवासांतील शेवटचे अज्ञातवासांतील वर्ष या ठिकाणी व्यतीत केले. महाराणा प्रतापसिंह यांनी इ.स.१७५५ मध्ये आताच्या अलवरची स्थापना केली. अलवर हे दिल्ली-जयपूर हायवेवर आंतल्या बाजूस जयपूरपासून १५० किमी वर आहे. ब्रिटिशांच्या काळात हे एक छोटेसे पण श्रीमंत संस्थान होते. अलवर व आजुबाजूची बरीच प्रेक्षणीय स्थळे पहाण्यासाठी परदेशी प्रवासी आवर्जून येतात.



१. सिटी पॅलेस व अलवार संग्रहालय

येथील प्रचंड मोठा राजवाडा हे त्याचे पहिले उदाहरण. इ.स.१७९३ मध्ये राजा बख्तवार सिंहनी बांधलेला हा राजवाडा आता राज्य सरकारच्या ताब्यात आहे. येथे सर्व सरकारी कार्यालये आणी न्यायालयही आहे. तिसऱ्या मजल्यावर अलवर म्यूझियम आहे. एका भागात तलवारी, ढाली, बरच्या, पोलादी शिरस्त्राणे, चिलखते, अंगरखे,राजपूत लढवय्यांची पेंटिंग्ज, दोन तलवारी एकत्र सामावणारे म्यान, अशा विविध दुर्मिळ वस्तूंचा व शस्त्रांचा संग्रह आहे. या ठिकाणी मुठीवर अकबर व जहांगीर यांच्या प्रतिमा असलेल्या दोन तलवारी आहेत. महंमद घोरी व औरंगजेब यांच्याही तलवारी आहेतच.

दुसऱ्या भागात विविध प्रसंगावरच्या चित्रांच्या तसबिरी आहेत. विशेषत: श्रीकृष्णाच्या जीवनावरील प्रसंगांचे चित्रण असलेल्या भरपूर फ्रेम्स आहेत. येथे २०० फूट लांब उलगडत जाणाऱ्या कागदाच्या गुंडाळीवर चित्रमय महाभारत साकारलेले आहे. येथील वस्तुसंग्रह उत्तम आहे. पण त्या ठिकाणी स्वच्छता व नीटनीटकेपणाची उणीव आहे हे जरा खटकतेच.



२.मौसी रानी की छत्री

येथे अनेक परदेशी प्रवासी आवर्जून येतात. राजवाड्याच्या बाजूला लागूनच 'मौसी रानी की छत्री' हे येथील राजे बख्तवारसिंह यांच्या सती गेलेल्या राणीचे एक सुरेख स्मारक आहे. चारी बाजूने अतिशय कोरीव व वेलबुट्यांनी नटलेले खांब व वरती तितक्याच कलाकुसरीचे छत आहे. खाली सती राणीची चार पावले कोरलेली आहेत. बाजूच्या पाण्याचे कुंडावर एक फरशी आहे. कुंडाच्या पाण्याने त्या पावलांना स्वच्छ केल्यावर काही स्त्रिया मुद्दाम ते पाणी आपल्या लहान मुलांना देतात. त्यामुळे त्यांना दृष्ट(नजर) लागत नाही अशी समजूत आहे. याला 'सतीचा महिमा'असेच म्हणावे लागेल! या पवित्र वास्तूची स्वच्छता मात्र हवी तशी राखली जात नाही याचे वाईट वाटते.

अलवरपासून जवळच १५ किमीवर 'सिलेसर्ह लेक पॅलेस ' हा राजवाडा आहे. संपूर्ण दोहो बाजूच्या झाडीतून जाणारा येथील रस्ता डामरी असून परदेशी पर्यटक मुद्दाम येथे येतात.समोरच्या मोठ्या सरोवरात बोटिंगची सोय आहे. पेडलिंग करुन पायाने चांगला दाब देऊन बोट पुढे नेताना चांगलाच व्यायाम होतो. लेकच्या मध्यापर्यंतच जाता येते कारण पुढे पाण्यात मगरींचा वावर अधिक आहे. लेक पॅलेसचे आता राजस्थान पर्यटन विभागाने हॉटेलात रूपांतर केले आहे. सभोवतालच्या नितांत सुंदर सौंदर्याचा अनुभव घेत येथे राहण्याची व खानपानाची व्यवस्था आहे.



३.बाल किल्ला-अलवर

अलवर शहराला लागूनच उंचावर अलवर किल्ला किंवा 'बाल किला' आहे. निकुंभ राजपुतानी बांधलेला हा किल्ला एक हजार वर्षांपेक्षा जुना आहे. भिंती व महाल भग्नावस्थेत असले तरी किल्ल्याची उंची व सुस्थितीत असलेली सभोवतालची तटबंदी लक्ष वेधून घेणारी आहे. अकबराने जहांगीरला येथे ५ महिने नजरकैदेत ठेवले होते असे सांगितले जाते. तसेच बाबर बादशहासुद्धा येथे राहून गेल्याची माहिती दिली जाते. किल्ला उतरून खाली येताना वाटेत कर्णी माता मंदीर व मारुती मंदीर लागते. ही दोन्ही मंदिरे छान व सुस्थितीत आहेत. शहरातून येथे लोक कायम दर्शनासाठी व फिरण्यासाठी येत असतात.

अलवरपासून ४२ किमीवर 'सरिस्का' हे वाघांसाठीचे खास अभयारण्य आहे. मुख्य प्रवेशद्वारापासून २० किमीवर पांडुपोल म्हणजे पांडु दरवाजा असून येथे पांडवानी वास्तव्य केल्याची आख्यायिका आहे.(राजस्थानात कोठेही 'पोल'चा अर्थ दरवाजा असा आहे.) येथे एक हनुमान मंदीर आहे. येथपर्यंतचा रस्ता चांगला डामरी असून येताना दोन्ही बाजूस आपणास हरणे व काळविटांचे कळप, वनगायी, सांबर, रानडुकरे, कोल्हे यांचे वारंवार दर्शन होते. मात्र या ठिकाणी एकही वाघ आढळून येत नाही. प्रवासी सतत येत असतात.रस्त्याच्या दोन्ही बाजूस घनदाट जंगल असून रस्त्यावरुन

*(पुढील मजकूर पृ. ७ वर पहा )*

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करावा म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मागील सप्टेंबर ते नोव्हेंबर २००७ या तिमाहीत दि. ८-०९-०७, व १३-१०-०७ या दिवशी कार्यकारी मंडळाच्या बैठका झाल्या. दिवाळीमुळे नोव्हेंबरमध्ये सभा घेता आली नाही.

१. शनिवार दि.८-०९-०७ ला प्रतिष्ठान कार्यालयात भरलेल्या बैठकीमध्ये अध्यक्षांनी वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी १३ ऑक्टोबर २००७ रोजी नातू सभागृह येथे श्री. भाऊ मराठे यांचा कार्यक्रम निश्चित केल्याचे सांगितले. कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे यांनी संस्थेच्या नोंदणीविषयक प्रमाणपत्राची डुप्लिकेट प्रत प्राप्त करण्याविषयीच्या कार्यवाहीबद्दल माहिती दिली. हितगुज त्रैमासिकाच्या प्रकाशन व वितरणासंबंधीच्या काही अडचणींबद्दल चर्चा झाली. ज्येष्ठ सदस्य श्री. वि. के.मराठे यांनी जागतिक चित्पावन महासंमेलनाच्या निमित्ताने लिहिलेल्या 'ब्राह्मण ज्ञाती संस्थांची आवश्यकता व भूमिका' या लेखाच्या झेरॉक्स प्रती तेथे वितरित कराव्यात असे ठरविण्यात आले.

२. दि. १३-१०-०७ रोजी ठाणे येथे नातू बाग येथे ४ वा. कार्यकारिणी सभा भरली. या बैठकीमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अडथळा आला. श्री. भाऊ मराठे यांच्या कार्यक्रमाला विलंब टाळण्यासाठी वीज नसूनही प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या हस्ते अगोदर पारितोषिक वितरण करण्यात आले. इतक्यात वीज आली, सभागृह उजळले, पंख्यातून वारे वाहू लागले आणि त्यामुळे उकाडा थोडा सुसह्य झाला. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देताना ते घेत असलेल्या शिक्षणाविषयी सांगितले. एकूण १३

*(पुढील मजकूर पृ. २० वर पहा)*

## या अंकात


| क्र. | विषय | लेखक | पृ. |
|---|---|---|---|
| ०१. | संपादकीय भूमिका | डॉ. सौ.सुमेधा प्र.मराठे | ०१ |
| ०२. | ब्राह्मण ज्ञाती संस्था-आवश्यकता आणि भूमिका | श्री. वि. के.मराठे | ०१,०४ |
| ०३. | राजस्थानातील अनोखे 'अलवर'( प्रवासवर्णन ) | श्री. जयंत र. मराठे | ०२,०७ |
| ०४. | प्रतिष्ठान वृत्त | | ०३,१७ |
| ०५. | सभासद वृत्त | | ०३,२२ |
| ०६. | या अंकात(अनुक्रमणिका) | | ०३ |
| ०७ | शत्रुनाशकरं दुर्गास्तोत्रम्। | प्रेषक -श्री. सी.गो.खांबेटे | ०५ |
| ०८. | कै.इंदिरा मराठे-उदयास्त (भावांजली) | श्री. वसंत गो कोतवाल | ०६ |
| ०९. | जीनेकी तमन्ना-बुजुर्गोंके साथ वहीदा रेहमान | श्री. वा.ग.मराठे | ०७ |
| १०. | CANADA IN THE MID-1950s | Dr. E V Marathe | ०८-१० |
| ११. | LAUGH IT AWAY | Mr.Ramakant Vidwans | १० |
| १२. | ज्योतिष: एक छंद व अभ्यास | सौ.रोहिणी वि. मराठे | ११ |
| १३. | साथ साथ-(कै.प्रमोद विष्णू यांना भावांजली ) | श्रीमती अर्चना प्र. मराठे | १२ |
| १४. | माहेरच्या आंगणात | सौ. स्वाती अभ्यंकर | १२ |
| १५. | श्री दत्तात्रेय जन्माख्यान | डॉ. सौ. सुमेधा प्र मराठे | १३,२१ |
| १६. | लाडक्या लेकीची पाठवणी | सौ.राधा श्रीकांत मराठे | १४ |
| १७. | चिं.ब.मराठे स्मृती निबंध स्पर्धा | | १५ |
| १८. | सलाम! सलाम! सलाम! (कविता) | श्रीमती सुनीती मराठे | १६ |
| १९. | दिवाळीचा फराळ (विनोदी लेख) | श्री.गजानन भा.मराठे | १८ |
| २०. | सदस्य-संवाद | श्री.सी.गो.खांबेटे | २० |
| २१. | चित्पावन महासंमेलन (अद्ययावत माहिती ) | | २१ |


# सभासद वृत्त

## मंगल सौख्यभरे

१. मु.पाली, जि.रायगड येथील सदस्य श्री. रत्नाकर सुंदर मराठे (पृ.१७०) यांचा पुत्र **चि. निलेश** याचा शुभ विवाह श्री. रमेश जनार्दन जोशी, महाड, यांची कन्या **चि.तृप्ती** हिचे बरोबर **२५ नोव्हेंबर २००७** रोजी भक्तनिवास , पाली (जि.रायगड) येथे संपन्न झाला.

२. डोंबिवली येथील सदस्य श्री.सुरेश गोविंद मराठे (पृ.८७) यांचा पुत्र **चि. सौरभ** याचा शुभ विवाह श्री. विजय लक्ष्मण खेडेकर, डोंबिवली यांची कन्या **चि.सुप्रिया** हिचे बरोबर **२६नोव्हेंबर २००७** रोजी पाटकर सभागृह, डोंबिवली, येथे संपन्न झाला.

०००

वरील सर्व नवविवाहिताना प्रतिष्ठानच्या शुभेच्छा. -०००-

## सहवेदना

१. पुणे येथील कुलबांधव श्री.सुधाकर राजाराम मराठे (पृ.३६६) यांच्या मातोश्री **श्रीमती सुमन (इंदिरा) राजाराम मराठे** यांना **दि.८-७-२००७** रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या मागे तीन पुत्र राजाराम, सुधाकर व अशोक आणि सुना, नातवंडे व कन्या सौ. रजनी भास्कर बर्वे ,जावई व कुटुंबीय आहेत.

२. बोरिवली येथील सदस्य **जयंत श्रीधर विद्वांस** (पृ.६४८) यांचे दि.**१५-९-२००७** रोजी वयाच्या ६१व्या वर्षी निधन झाले. ते मुंबई महागरपालिकेमधून ॲडमिन ऑफिसर म्हणून निवृत्त झाले.सोसायटीमध्ये ते संस्कारवर्ग चालवीत असत.परांजपे नगरातील फलकावर विविध सांस्कृतिक विषयांवर ते नेमाने लिहित असत. त्या निमित्त त्यांचा अनेक क्षेत्रातील व्यक्तींशी संपर्क होता.त्यांच्यामागे पत्नी भावना, पुत्र नितिन व कन्या सौ.शीतल वैद्य आणि नातवंडे असा परिवार आहे

*(पुढील मजकूर पृ. २२वर पहा)*

*(ब्राह्मण ज्ञातीसंस्था-पृ. १ वरून)*

अत्यंत जरूरीचे आहे. विचारांची बैठक पक्की झाली, मनातील गोंधळ दूर झाला तरच तरुण कार्यकर्ते निर्माण होतील. समाजकार्याची ही धुरा मागच्या पिढीकडून घेऊन ती आपली पुढची पिढी कार्यतत्पर होईपर्यंत स्वखुशीने वाहून नेतील.

**आवश्यकता -**

या बाबतीत गांभीर्याने विचार करताना एक गोष्ट आपण सतत लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ब्राह्मण हा सुद्धा माणूसच आहे. तो अतिमानव (superman ) किंवा अमानुष (devil) नाही. मानवी स्वभावाचे सर्व स्थायीभाव त्याचे ठिकाणी आहेत. तेंव्हा साहजिकच माणसाचे सर्व गुणदोष त्याचे ठिकाणी आहेत. तो इतर समाज घटकांबरोबर सामाजिक जीवन जगणारा एक समाज घटक आहे. सर्व भौतिक सुखांचा त्याग केवळ त्यानीच करावा आणि इतर समाजघटकांकडून फार तर कौतुकाच्या एखाद्या शब्दाची माफक अपेक्षा बाळगावी हा विचारच कालबाह्य ठरला आहे.

ब्राह्मण या वर्गाकडे भारतीय समाज रचनेनुसार अध्ययन, अध्यापन आणि इतर घटकांच्या धार्मिक कार्यांमध्ये मार्गदर्शन करणे ही समाजकर्तव्ये त्याच्या वारश्याला आली होती. (हो, होती असे भूतकाळी रूप वापरणे क्रमप्राप्त आहे!) गुरुगृही बारा वर्षे उत्तम ज्ञानार्जन करणे व तदनंतर अध्यापकाची भूमिका घेऊन ज्ञानदान करणे ही त्याची जीवन निष्ठा होती. धनप्राप्तीचे मार्ग त्याला वर्ज्य होते. या त्यागमय कर्तव्याची भरपाई (compensation) म्हणून या वर्गाला समाजात मानाचे स्थान होते. सर्व सत्ता हाती असलेले सत्ताधीश सुद्धा ज्ञानसंपन्न गुरुजनांचा मान भर दरबारात ठेवीत.

आता त्यानी इतरेजनात किती ज्ञानप्रसार केला आणि किती प्रमाणात ज्ञानधन स्वजातीपुरतेच राखून ठेवले हा विषय विवाद्य होईल. पण शे-दोनशे नव्हे तर हजारो वर्षे लेखनकला अस्तित्वात नव्हती तेव्हापासून श्रुति आणि स्मृति यांच्या जोरावर ज्ञान संपादन केले व पिढ्यान पिढ्या त्याचे जतन व वितरण केले हे सत्य आहे. त्यांचे हे ऋण मान्य करून पुढचा मुद्दा विचारात घेऊया.

काळ बदलला. लेखनकला व कालांतराने मुद्रणकला विकसित झाल्या. केवळ श्रुति-स्मृतींचा आधार न घेता ग्रंथपठणाने ज्ञानार्जन करण्याची संधी प्राप्त झाली. ज्ञानाचा प्रसार वेगाने झाला. विज्ञान क्षेत्राने तर आघाडीच मारली. वर्णाश्रम पद्धती कालबाह्य ठरली. सर्व भौतिक सुखाना लाथाडून केवळ अध्ययन व अध्यापन यांना वाहून घेण्याचे प्रयोजनच उरले नाही. आता आपण स्वीकारू तो वर्ण आणि करू ते कर्तव्य अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या मंथनात ज्ञातीसंस्था कशा टिकून राहणार आणि कोण या संस्था टिकविणार?

परंतु या प्रश्नाला दुसरीही बाजू आहे आणि या बाजूचा गंभीरपणे विचार करणे हे न्यायोचित ठरेल. ब्राह्मण तरुणांच्या मनात एक असा दृढ समज आहे की जवळ जवळ सर्व क्षेत्रात, विशेषतः राजकारण, नोकरी व शिक्षणक्षेत्रात त्यांची लायकी असूनसुद्धा त्यांना बुद्धिपुरस्पर डावलले जात आहे. ब्राह्मण समाज अल्पसंख्य असूनही वरील क्षेत्रात त्यांची टक्केवारी जबरदस्त आहे हे एक कारण पुढे केले जाते. *(अलिकडे मात्र या टक्केवारीत वेगाने घट होत आहे.)* म्हणजेच अध्ययन व अध्यापन क्षेत्रात त्यांच्या पूर्वजांनी जवळ जवळ एकाधिकार गाजवल्यामुळे या तरुणाना वेगळीच कसोटी लावली जाते. उदाहरणार्थ, प्रथमश्रेणीत उत्तीर्ण होऊन सुद्धा त्याना त्यांच्या आवडीच्या शैक्षणिक शाखेत प्रवेश मिळत नाही. अंगी पात्रता असूनदेखील नोकरीच्या क्षेत्रात उच्च स्थान गाठता येत नाही. ही अवस्था हुशार तरुणांची. मग दुय्यम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या व नुसतेच उत्तीर्ण होणाऱ्यांची दैना काय वर्णावी?

मागासलेल्या वर्गातील तरुणाना ज्यास्तीत ज्यास्त संधी प्राप्त करुन देणे कितीही न्याय्य व उचित असले तरी पूर्वजांच्या कर्तृत्वाची मधुर फळे कडू जहर होऊन ती त्यांच्या निष्पाप वंशजाना खाण्याची वेळ यावी व तीसुद्धा समानतेची तुतारी वारंवार फुंकणाऱ्या लोकशाही कल्याणकारी राज्यात यावी हे पाहून हे तरुण दिङ्मूढ झाले आहेत, निराशाग्रस्त झाले आहेत. त्यांचे आक्रंदन ऐकून घेण्यास कोणी तयार नाही. काही तयार झालेच तरं ऐकून सवरून न ऐकण्यासारखे करणेच त्याना सोयिस्कर वाटते.

कोणाची सहानुभूती नाही, किंवा पाठीवर हात फिरवून धीर देणारे कोणी नाही. स्वजातीयांकडून ही वागणूक तर इतरांकडून अपेक्षा करणे दूरच. अशा असहाय्य तरुणांच्या वारंवार मनात येते कि आपण ब्राह्मण आईबापांच्या पोटी जन्माला येण्याऐवजी इतर कोणत्याही ज्ञातीमध्ये जन्म घेतला असता तर अशी परवड झाली नसती. बरे, ब्राह्मण ज्ञाती धनसंपन्न असती तर नोकरीचा वा आर्थिक मदतीचा प्रश्नच उरला नसता. भारतात नाही तर परदेशी जाऊन त्याना आपली ज्ञानतृष्णा भागविता आली असती. पण वस्तुस्थिती निराळी आहे. जवळजवळ नव्वद टक्के ब्राह्मणसमाज उच्च वा निम्न पण मध्यमवर्गातच विखुरला आहे. कसेबसे शिक्षण पुरे करूनही अर्थार्जन कसे करावे हा यक्ष प्रश्न त्यांचे पुढे उभा राहतो. भांडवल नाही, कुटुंबात कोणी उद्योजक नाही, मार्गदर्शक नाही, अशा नकारघंटांच्या नादांत 'नोकऱ्या लाथाडून उद्योगात शिरा, उद्योजक व्हा,' असा कोरडा उपदेश वांझोटाच ठरणार.

तेंव्हा या भग्नहृदयी तरुणांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवायला, त्यांच्या पाठीशी अभेद्य खडकाप्रमाणे उभे राहण्यासाठी, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून कर्तृत्ववान तरुणांची निर्मिती करण्यासाठी ज्ञातीसंस्थानाच पुढाकार घ्यावा लागेल. या महान व पुण्यप्रद समाज कार्यासाठी ज्ञातीसंस्थांची नितांत आवश्यकता आहे. हा मुद्दा इतक्या विस्ताराने मांडावा लागला कारण मनातील गोंधळ नाहीसा झाला तरच या ज्ञातीसंस्थाना सेवाव्रती कार्यकर्ते उपलब्ध होतील.

**भूमिका-**

ब्राह्मण ज्ञातीविषयी विचार करताना वक्ता वा लेखक भावुक बनतात. ते विचारांपेक्षा भावनानाच जास्त महत्त्व देतात. भावनात्मक दृष्टीकोण साहित्य निर्मितीला कितीही पोषक असला तरी एखादी समस्या सुटण्याच्या बाबतीत तो फारसा उपयोगी पडत नाही. या दृष्टीकोणातून बोलणारे वा लिहिणारे टीकाकार किती अतिशयोक्तिपूर्ण विधाने करतात व ती कशी परस्परविरोधी असतात हे पाहूया.

काहींच्या मते ब्राह्मण ज्ञाती अतिशय बुद्धिमान, अलौकिक कर्तृत्ववान, कुशल, व्यवहारी, स्वार्थत्यागी, हाडाची राजकारणी व प्रशासनाला सर्वस्वी योग्य अशी आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात जागोजागी याचे पुरावे आहेत. अशी परिस्थिती असूनही महाराष्ट्राला व भारताला त्याची किंमत नाही कारण ती अत्यंत अल्पसंख्य आहे. 'एक डोके एक मत' च्या लोकशाहीच्या जमान्यात या ज्ञातीला स्थान नाही, असे निराशाजन्य उद्गार काढून हे विचारवंत ही ज्ञाती कालौघात नष्ट होणार असे भविष्य वर्तवून मोकळे होतात.

या उलट काही विचारवंतांच्या मते ब्राह्मण ज्ञाती पुराणमतवादी, काही अंशी दुर्दैवाने तर काही अंशी अंगभूत दोषांमुळे असमाधानकारक जीवन वाट्याला आले असता त्याचीच प्रौढी मिरविणारी, भलतीच अल्पसंतुष्ट, कोणतेही धाडस न करणारी,

कोणाशीही अगदी जवळच्या नातेवाइकाशी सुद्धा पटवून न घेणारी आत्मकेन्द्रित आहे. नको तिथे तत्त्वाचा प्रश्न उभा करून कार्यनाश करणारी आहे. तपशिलाचा नसता घोळ घालून निर्णयाप्रत कधीही न येणारी आहे. कोणाचाही ऊर्जित काळ सहन न करणारी आहे. आपणाला न जमणारी गोष्ट अन्य कोणालाही जमू नये अशी सुप्त इच्छा बाळगणारी आहे. थोडक्यात, एकसंध होऊन परस्पर उत्कर्ष साधण्याच्या दृष्टीने सर्वस्वी अयोग्य अशी ही ज्ञाती आहे. कलियुगात संघशक्तीलाच महत्त्व आहे. वरील दोष असलेली ब्राह्मणज्ञाती ही मुळीच टिकाव धरू शकणार नाही असे ठामपणे सांगून आपल्या अंगभूत दोषांमुळे ही ज्ञाती हळुहळू नामशेष होईल असे भविष्य हे विचारवंत ठामपणे वर्तवितात. म्हणजे वरील दोन्ही प्रकारचे विचारवंत ब्राह्मण ज्ञातीचे त्यांच्या कल्पनेप्रमाणे काळेकुट्ट भवितव्य रेखाटून परस्परविरोधी कारण परंपरा देत ब्राह्मणज्ञाती कालौघात नष्ट होणार या वर्तुळाच्या टोकापाशी एकत्र येतात. या वर्तुळाचा न्याय खरोखर अजब आहे!

दोषारोप सहन करून शांत चित्ताने आपल्या काहीशा तऱ्हेवाईक ज्ञातिबांधवाना एकत्र करून त्यांचे गैरसमज व त्यांचे ठिकाणी असलेले न्यूनगंड नाहीसे करून त्याना कार्यप्रवण करण्याची अपेक्षा या विचारवंतांकडून कोण करणार?

आपण सारे ज्ञातीबांधव विशाल भारतीय समाजाचे अभेद्य घटक आहोत. आपल्या ज्ञातीचे भवितव्य विशाल खंडप्राय भारताच्या समग्र जनतेच्या भवितव्याशीच निगडित आहे. आपली प्रत्येक कृती आपल्या देशाच्या उत्कर्षात भर घालणारीच असावी. आपल्यापाशी जे जे उत्तम, विधायक स्वरूपाचे आहे ते ते आपण देशार्पण केले पाहिजे. ज्ञातीसंस्था कार्यकर्त्यानी व इतर ज्ञातीबंधूनी हा विचार पक्का केला की आपण केवळ एकाच ज्ञातीची सेवा करतो म्हणून आपली हेटाळणी झाली, संकुचित वृत्तीचा आरोप करण्यात आला तर वाईट वाटून घेण्याचे काहीच कारण नाही.

ज्ञातीसंस्थांच्या कार्यकर्त्यांच्या अविरत प्रयत्नांनी जर देशाला भारतीय कीर्तीचे किंबहुना जागतिक कीर्तीचे खेळाडू मिळाले, संशोधक मिळाले, उद्यम जगतात भारताचे नांव उज्ज्वल करणारे उद्योजक मिळाले, संरक्षणदलाला अधिकारी वा सैनिक मिळाले, निरपेक्ष सेवा करणारे डॉक्टर मिळाले, रंगभूमी, चित्रभूमी, साहित्यक्षेत्र, प्रशासनक्षेत्र याना कर्तबगार कलाकार आणि प्रशासक मिळाले तर ती एक आदर्श देशसेवाच ठरेल. राजकारणाच्या वाटेला न जाता, राजकारणात अल्पसंख्य असल्यामुळे स्थान न मिळाल्याने हताश न होता आपणाला अश्या प्रकारे देशसेवा करता येईल. तरुणांमधले सुप्तगुण हेरून त्याना सर्वतोपरी साहाय्य करून त्यांच्यामधून निरनिराळ्या क्षेत्रात आदर्श ठरणारे घटक निर्माण होऊन जातीसंस्था टिकतील, अधिक विकसित होतील. -०-

## शत्रुनाशकरम् दुर्गास्तोत्रम्

प्रेषक- सी.गो.खांबेटे

**श्रीगणेशाय नमः। संजय उवाच।।**
धार्तराष्ट्रबलं दृष्ट्वा युद्धाय समुपस्थितः।
अर्जुनस्य हितार्थाय कृष्णो वचनमब्रीत् ।।१।।
**श्रीभगवानुवाच।।**
शुचिर्भूत्वा महाबाहो संग्रामाभिमुखेस्थितः।
पराजयाय शत्रूणां दुर्गास्तोत्रमुदीरय ।।२।।
**संजय उवाच ।।**
एवमुक्तोऽर्जुनः संख्ये वासुदेवे धीमता ।
अवतीर्य रथात्पार्थः स्तोत्रमाहकृताञ्जलिः।।३।।
**अर्जुन उवाच।।**
ॐ नमस्ते सिद्धसेनानि आर्ये मंदारवासिनी ।
कुमारि कालि कापालि कपिले कृष्णपिङ्गले।।४।
भद्रकालि नमस्तुभ्यं महाकालि नमोऽस्तुते ।
चण्डि चण्डे नमस्तुभ्यं तारिणि वरवर्णिनि ।। ५।।
कात्यायनि महाभागे करालि विजये जये ।
शिखिपिच्छध्वजधरे नानाभरणभूषिते।।६।।
अट्टशूलप्रहरणे खड्गखेटकधारिणि ।
गोपेन्द्रस्यानुजे ज्येष्ठे नन्द गोपकुलोद्भवे ।।७।।
महिषासृक्प्रिये नित्यं कौशिकि पीतवासिनि ।
अट्टहासे कोकमुखे नमस्तेऽस्तु रणप्रिये ।।८।।
उमे शाकंभरि श्वेते कृष्णे कैटभनाशिनि।
हिरण्याक्षि विरूपाक्षि सुधूम्राक्षि नमोऽस्तु ते।९।
वेदश्रुति महापुण्ये ब्रह्मण्ये जातवेदसि ।
जम्बूकटकचैत्येषु नित्यं सन्निहितालये ।।१०।।
त्वं ब्रह्मविद्या विद्यानां महानिद्रा च देहिनाम् ।
स्कंदमातर्भगवति दुर्गे कान्तारवासिनि ।।११।।
स्वाहाकारः स्वधा चैव कला काष्ठा सरस्वती।
सावित्रि वेदमाता च तथा वेदान्त उच्यते ।।१२।
स्तुताऽसि त्वं महादेवि विशुद्धेनान्तरात्मना ।
जयो भवतु मे नित्यं त्वत्प्रसादाद्रणाजिरे ।।१३।।
कान्तारभयदुर्गेषु भक्तानां चालयेषु च ।
नित्यं वससि पाताले युद्धे जयसि दानवान् ।।१४।
त्वं जम्भिनी मोहिनी च माया ह्रीः श्रीस्तथैव च।
सन्ध्या प्रभावती चैव सावित्री जननी तथा ।।१५।
तुष्टिः पुष्टिर्धृतिर्दीप्तिश्चंद्रादित्यविवर्धिनी ।
भूतिर्भूतिमतां संख्ये वीक्ष्यसे सिद्धचारणैः ।।१६।
**संजय उवाच ।**
ततः पार्थस्य विज्ञाय भक्तिं मानववत्सला ।
अन्तरिक्ष गतोवाच गोविंदस्याग्रतः स्थिता ।। ७।
**देवी उवाच।**
स्वल्पेनैव तु कालेन शत्रूञ्जेष्यसि पाण्डव ।
नरस्त्वमसि दुर्धर्ष नारायणसहायवान् ।।१८।।
अजेयस्त्वं रणेऽरीणामपिवज्रभृतः स्वयम् ।
इत्येवमुक्त्वा वरदा क्षणेनान्तरधीयत ।।१९।।
**संजय उवाच।**
लब्ध्वा वरं तु कौन्तेयो मेने विजयमात्मनः।
आरुरोह ततः पार्थो रथं परमसंमतम् ।।२०।।
श्रीकृष्णार्जुनावेकरथौ दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ।
य इदं पठते स्तोत्रं कल्य उत्थाय मानवः।।२१।।
यक्षरक्षःपिशाचेभ्यो न भयं विद्यते सदा ।
न चापि रिपवस्तेभ्यः सर्पाद्या ये च दंष्ट्रिणः।।२२।
न भयं विद्यते तस्य सदा राजकुलादपि ।
विवादे जयमाप्नोति बद्धो मुच्यति बन्धनात्।।२३।
दुर्गं तरति चावश्यं तथा चौरै र्विमुच्यते।
संग्रामे विजयेन्नित्यं लक्ष्मीं प्राप्नोति केवलाम् ।२४
आरोग्यबल सम्पन्नो जीवेद्वर्षशतं तथा ।
एतद्दृष्टं प्रसादात्तु मया व्यासस्य धीमतः।।२५।
मोहादेतौ न जानन्ति नरनारायणावृषी ।
तव पुत्रा दुरात्मानःसर्वे मन्युवशानुगाः।।२६।।
प्राप्तकालमिदं वाक्यं कालपाशेन कुण्ठिताः।
द्वैपायनो नारदश्च कण्वो रामस्तथाऽनघः।।२७।
अवारयंस्तव सुतं न चासौ तद्गृहीतवान्।
यत्र धर्मो द्युतिः कान्तिर्यत्र ह्रीः श्रीस्तथा मतिः।
यतो धर्मस्ततः कृष्णो यतः कृष्णस्ततो जयः।२८।
इतिश्रीमन्महाभारते भीष्मपर्वणि श्रीकृष्णार्जुनसंवादे
**श्रीदुर्गास्तोत्रं संपूर्णम्।**

## कै.इंदिरा वामन मराठे - *उदयास्त आढावा.*

ले.वसंत गो कोतवाल,४०१/४०२ ॐ सरस्वती अपार्ट. डॉ.गुप्ते चौक, दूधनाका, कल्याण-प.४२१३०१.
फोन-०२५१-२२१००५८

*(प्रतिष्ठानचे कोलबाड, ठाणे येथील सदस्य श्री.सुरेश वामन मराठे (पृ. ७६२) यांच्या मातोश्रींना अलिकडेच देवाज्ञा झाली. त्यांच्या कुटुंबियांच्या इच्छेनुसार हा खास लेख प्रसिद्ध करीत आहोत. त्यांच्या दुःखात समस्त मराठे परिवार सहभागी आहे. -सह संपादक)*

सासूबाईंचा कल्याणातील दुधनाका ते गांधी चौक एवढ्या छोट्या अंतराचा ८० वर्षांतील प्रवास असला तरी तो अनेक चढउतारांनी भरलेला आहे. फडके चाळीतील श्री. जोशी यांच्या कुटुंबात १९२८ साली जन्म झाला आणि पूर्वाश्रमीच्या दुर्गा व आताच्या इंदिराबाई (माझ्या सासूबाई) यांचा प्रवास सुरू झाला.

इंदिराबाई, ३ बहिणी आणि दोन भाऊ असा जोशी कुटुंबाचा वंशवृक्ष. वडिलांचे छत्र लहानपणीच हरपल्यावर जोशी कुटुंबाची सर्व जबाबदारी इंदिराबाईंवर पडली. त्या काळच्या मानाने व्हर्नाक्युलर फायनल पास झाल्यानंतर, त्यांना वडिलांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी मिळाली आणि त्यांनी जोशी कुटुंबाचा आधारवड बनून आपली जबाबदारी समर्थपणे पेलली. यामध्ये भावंडांचे शिक्षण, त्यांची मंगलकार्ये व स्वतःचे लग्न हे सर्वच आले.

ऐकीव माहितीवरून आणि समकालीनांच्या सांगण्यावरुन समजते की सासूबाई तरुणपणी सडपातळ शरीरयष्टीच्या तरीही आकर्षक व्यक्तिमत्वाच्या होत्या. त्या काळी प्रेमविवाहाची पद्धत नव्हती. तरी एकतर्फी प्रेमाचे रूपांतर 'मागणी' मध्ये होत असे. वामनराव मराठ्यांनी जोश्यांच्या दुर्गेस मागणी घातली आणि दुर्गा वामनरावांची झाली. लग्नानंतर सासुबाईंच्या जबाबदाऱ्यांमध्ये वाढच झाली कारण वडिलांचा संसार, स्वतःचा संसार आणि जिल्हा परिषदेच्या शाळेचा संसार अशी तिन्ही आघाड्यांवर दमछाक होईपर्यंत त्यांची धावपळ सुरू राहिली. त्यातच जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजे बदलीची टांगती तरवार नेहमीच डोक्यावर असायची व बहुतेक वेळा दुर्गम खेड्यामध्ये काम करण्याची वेळ त्यांच्यावर यायची.

सासूबाई स्वभावाने जिद्दी होत्या. बढतीची द्वारे खुली होण्यासाठी १९७२ साली म्हणजे वयाच्या ४४ व्या वर्षी त्यानी एस एस सी परीक्षेचे दिव्य पार केले. जिल्हा म्हणून सेवानिवृत्त झाल्या. १९८३ मध्ये त्यांना मिळालेला राज्य स्तरावरील आदर्श शिक्षिका पुरस्कार हा त्यांच्या जिल्हा परिषदेचा शाळांच्या कारकीर्दीतील सर्वोच्च बिंदू. सासूबाईना काव्य-लेखन-वाचन यांची आवड होती. जवळच्या नातेवाईकांच्या आणि आप्तेष्टांच्या दुःखाच्या प्रसंगी प्रसंगानुरूप काव्य करण्यात त्यांचा हातखंडा होता. सासुबाईंना पत्ते विशेषतः कॅनेस्टा खेळण्याची फार हौस. ऐंशीव्या वर्षीसुद्धा कॅनेस्टा खेळायला बसल्या की त्यांना काळवेळेचे भान नसायचे.

शरीराच्या बारिक सारिक तक्रारींकडे दुर्लक्ष न करता ताबडतोब वैद्यकीय उपचार घेण्यात त्यांनी कधी हयगय केली नाही. त्यांच्या दीर्घायुष्याचे हेच गमक असावे. पित्ताशय काढून टाकण्याच्या अवघड शस्त्रक्रियेस ७९ व्या वर्षी त्या धैर्याने सामोऱ्या गेल्या. त्यापूर्वी रक्ताच्या उलट्या होणे, पित्ताशयातील कृत्रिम नळी ठराविक कालावधीने बदलणे, या आणि अशा अनेक दिव्यातून त्या सुखरूप पार पडल्या. निवृत्ती वेतन मिळत असल्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य होते.त्याचा उपयोग फक्त बँकेतील शिल्लक वाढविण्यासाठी न करता सणासुदीच्या वेळी नातेवाइकांना आर्थिक मदत देण्यास त्यानी मागे पुढे कधी पाहिले नाही व त्याचा कुठे गवगवाही केला नाही.

पूर्वीच्या काळी रुक्ष व्यवहारापेक्षा नातेसंबंधांना विवाह लहान वयात होत असल्यामुळे वास्तविक बहिण भावांचा सहवास फार कमी घडायचा. तरी सुद्धा या पिढीने नातेसंबंध शेवटपर्यंत जपले. सासुबाई अत्यवस्थ असताना अर्धग्लानीच्या अवस्थेत त्यांच्या तोंडून बहिणींची भावाची आठवण यायची. सासुबाईंचे भाऊ मुकुंदमामा जोशी याची पंचाहत्तरी होऊन सुद्धा टिटवाळ्याहून येऊन रुग्ण शय्येवरील बहिणी बहिणीजवळ रोज दुपारी ४-५ तास बसत होते.

कष्टाळू, जिद्दी, निर्भय, प्रेमळ, स्नेहाळ सर्जनशील,सुधारक वृत्तीच्या इंदिराबाईंचे दिनांक २४ ऑक्टोबर २००७ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने आमच्या नात्यातील एक पिढी संपली. आमचे छत्र हरपले. त्यांच्या सत्कर्मुसार त्यांना सद्गती प्राप्त होईलच.

*श्री.वसंत गो.कोतवाल (जावई) आणि*
*सौ.सुजाता व.कोतवाल(माहेरची सुनंदा वामन मराठे)*
१-११-२००७

-०-

### *एखादी तरी स्मितरेषा -१*

*(हितगुज मध्ये कधी कधी पान-पूरके म्हणून 'हंसरे हितगूज' या सदराच्या माध्यमातून विनोद, चुटके, वात्रटिका प्रसिद्ध केल्या जात असत. या ऐवजी 'एखादी तरी स्मितरेषा' हे नवीन नियमित सदर सुरू करीत आहोत. यासाठी सदस्यांनी पाठिलेल्या साहित्याचा यथावकाश उपयोग केला जाईल. साहित्याची भाषा मराठी , हिंदी , संस्कृत अथवा इंग्रजी असावी. इ-मेल केल्यास नांव पत्ता कळवावा. याअंकात काही इंग्रजी चुटके मोकळ्या जागांमध्ये देत आहोत. सह-संपादक)*

Teacher : Correct the sentence, "A bull and a cow is grazing in the field"
Student :A cow and a bull is grazing in the field.
Teacher : How?
Student : Ladies first.!

-0-

Sardar told his servant: " Go and water the plants."
Servant- " it's already raining."
Sardar- " So what? Take an umbrella and go"

-0-

Sardar wins 20 cr from Rs. 20 lottery ticket. Dealer gave 11cr after deducting tax.
Angry Sardar: "Give me 20 cr or else return my 20 Rs back"

-0-

**कै.सदाशिव विनायक मराठे, वकील, बार्शी**
**यांच्या पुण्यतिथी निमित्त- ११ जानेवारी**
**मराठे बंधू , बार्शी (पृ.३६५)**

*(अनोखे अलवर पृ. २ वरून)*

एकावेळी एकच वाहन जाऊ शकते. त्यामुळे संध्याकाळ वाढत जाताच थोडी भीती मनात येऊन जाते. रात्री सात नंतर येथे कोणालाही थांबता येत नाही.

अलवर सरिस्का रस्त्याच्या मार्गावर सरिस्का पासून १० किमी वर आंत तल्वरक्षा हे ठिकाण असून तेथे गरम पाण्याचे झरे होते असे सांगतात. पण आता तसे ते नाहीत. त्यामुळे तेथे जाणे झाले नाही.

अलवर येथे लष्कराचे मोठे कँटोनमेंट असून त्या भागात राजाने 'इटा' या राणीसाठी बांधलेला 'इटराना' पॅलेस आहे. अतिशय सुरेख कलाकृती असलेला हा राजवाडा सध्या लष्कराच्या सप्लाय कँटीनसाठी वापरला जातो.

अलवर शहरात खास राजस्थानी चिजा म्हणजे कलाकुसरीच्या साड्या,उंटांच्या कातडीपासून बनविलेले जूते, जवळच्या रामगढ येथील हस्तकलांच्या व मातीच्या विविध वस्तू योग्य दरात मिळतात. अलवर शहर अरवली पर्वताच्या रांगानी वेढलेले असल्यामुळे व भोवताली भरपूर झाडी असल्यामुळे येथील तापमान हिवाळ्यात बरेच खाली येते. साहजिकच हुडहुडी भरविणारी थंडी दिवसभर जाणवते.

अलवरनंतर आम्ही जयपूर, अजमेर, पुष्कर, अमेरगड, निहारगड,जयगड, चितोडगड, ही सगळी ठिकाणे पाहिली. पण भरतपूरचे पक्षी उद्यान एका बाजूस व सरिस्काचे प्राणी अभयारण्य दुसरीकडे असलेल्या अलवरचे महत्त्व व तेथील प्रेक्षणीय स्थळे यांची इतर पर्यटन स्थळांच्या मानाने कमी माहिती आहे. पर्यटकांनी या ठिकाणी एकदा जरूर जाऊन यावे. राजस्थान पर्यटन विभागाचे कार्यालय व टूरिस्ट हॉटेल्सची सोय येथे उपलब्ध आहे.

-०-



# "जीनेकी तमन्ना : बुजुर्गोंके साथ-वहीदा रेहमान"

-वा.ग.मराठे , जोगेश्वरी-पू. मुंबई ४००००० 

✆ : २८२६९४०२.

(आपले 'वा.ग.' अलिकडे जुहू येथील 'डॅफोडिल्स' नामक एका उच्चभ्रू सीनियर सिटिझन्स संस्थेच्या मासिक कार्यक्रमाना उपस्थित राहतात. अशाच एका संध्याकाळी वहिदा रेहमान प्रमूख अतिथी या नात्याने उपस्थित होत्या. त्यांनी ज्येष्ठांशी केलेले हे 'हितगुज' उद्‌बोधक वाटेल. योगायोगाने मी सुद्धा या प्रसंगी हजर होतो. -सी.गो.खांबेटे, सहसंपादक)

संध्याकाळचे ५ वाजले होते. सगळ्या म्हाताऱ्यांच्या नजरा वहीदाच्या आगमनाकडे डोळे लावून होत्या. जो तो एकमेकांना खुणावत होता. शेवटी वहिदाचे स्वागत 'आज की तमन्ना' ने करायचे ठरले. तसे प्रत्येकाच्या गळ्यातून सूर निघू लागले. 'रंगीला रे', 'चौदहवी का चांद' पासून जवळ जवळ सर्वच गाण्यांची रिहर्सल झाली.

शेवटी एकदा वहिदाचे आगमन झाले. चेहऱ्यावर कुठलाही मेकप नाही. पांढरे शुभ्र चमकदार केस. पण उत्साह मात्र तरुणांनाही लाजवेल असा. आहा, काय ती अदाकारी! तिने लगेचच बोलायला सुरुवात केली.

" मी अजूनही स्वतःला सोळा वर्षांचीच समजते. तुम्ही म्हातारे आहात असे चुकूनही समजू नका. प्रत्येक दिवसाचा प्रत्येक क्षण आनंदात घालवायचा प्रयत्न करा. येणाऱ्या दुःखाची वाट पाहून पळण्याचा प्रयत्न करू नका. जो होता है वही होनेवाला है! उससे डरनेकाच नही। भागम भाग क्यों करना? आखिर एक दिन जानाही है! तुम्ही टी.व्ही पहा. डिस्कव्हरी चॅनेल, समुद्र, पक्षी, पर्वत, निसर्गाच्या रूपाचा आनंद घ्या. प्रत्येकाला दुःख असतेच. दुःखाशिवाय सुखाची गोडी कळतच नाही. डॉक्टरसुद्धा चोवीस तास आपल्या जवळ नसतोच. असतात त्या फक्त गोळ्या! शेवटी त्याच आपली सोबत करतात. मी जेव्हा 'मूड ऑफ' होते तेव्हा तर सगळे दागिने, नवीनसे कपडे करून आरशासमोर बसते, नाही तर गाडी काढून बाहेर पडते. मूड आल्यावर परत येते. पण तेवढ्यातच हरवलेले गवसते."

"सुंदर सुंदर गाणी ऐका. म्हणायची प्रॅक्टीस करा. छान छान पुस्तके वाचा. पॉझिटिव्ह ॲप्रोच ठेवायला शिका. थोडक्यात, निसर्गाच्या नाना रूपांतच स्वतःला ओळखायला शिका. जुने जपा व नव्याची ओळख करून घ्या. तरच तुम्ही सर्वांना हवेहवेसे वाटाल. नाहीपेक्षा साधा रिमोट सुद्धा तुम्हाला चालवायला येणार नाही. तुमच्या गळ्यात लता, आशाचे सूर नसतील, पण तुम्हीच तुमच्या स्वरांची ओळख करून घ्या. कोण म्हणतय की तुमचा आवाज बेसूर आहे? सूर असेल तरच बेसूर होणार नाही का? साधे गुणगुणायला सप्तसूर कुठे हवे असतात? मधमाशा नाही का गणुगुणत?"

पूर्वी आमचे आजी आजोबा नाही का स्तोत्रे म्हणत असत? त्याना कुठे मिळाले होते शिक्षण? होते फक्त संस्कार. ते संस्कारच आमचे जीवन घडवायला समर्थ ठरेल. स्वच्छ, सुंदर, निरोगी आणि निरामय जीवन जगा. किती तरी छंद, दृक् श्राव्य माध्यमे आहेत. नित्य नवी नवी दालने उघडत आहेत. पिझ्झा बरोबर साधा पावही खावयास हवा. त्याची चव घ्यायला नको का?

बोधामृत पाजून झाल्यावर वहिदा आली त्याच झपाट्यात लगबगीने निघूनही गेली. त्या आधीच्या उर्वरित कार्यक्रमात बुझुर्गांचे वाढदिवस केक कापून, मेणबत्त्या पेटवून साजरे झाले. आणि 'हॅपी डेज आर हियर, तुम जियो हजारो साल' असे म्हणून प्रत्येकच म्हातारा म्हातारीचे उजळलेले चेहरे न दिसणारे हंसू व आंसू पहात सर्वांनी एकमेकांचा निरोप घेऊन या बुजुर्गांच्या समारंभाची सांगता झाली.

घरी परतताना आकाशात मला मात्र 'चौदहवीका चांद'च सतत खुणावत राहिला..

-०-

पणजोबा प्रभाकर शिवराम मराठे यांच्या स्मरणार्थ

प्रभाकर दामोदर मराठे वडाळा, मुंबई ४०००३१

सेल: ९८२० २३२ ०८२ दूरध्वनी : २ ४१५ ०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com

# CANADA IN THE MID-1950s

-Dr. Eknath Vyankatesh Marathe,
'25, King's Grant Road, St. Catharines,Ontario, ON L2N 2S1 Canada
**Phone: (905)-934-1796; Fax-(905)-934-9983. Email-emarathe@vaxxine.com**

After working at the National Chemical Laboratory of India, in the area of Instrumentation and Radio-active Tracer Technique, I left India for Canada on 15th of August 1955 (Indian Independence Day), on a one year fellowship, to do further research in Nuclear Physics (Mass Spectrometry) at Nuclear Research Laboratory, McMaster University, Hamilton. At that time one way airfare from Bombay to Toronto was $1200.00 (CAN); I could not afford it, therefore I traveled by boat, P&O S S. Strathmore. Travel fare by boat from Bombay to Montreal was, $500.00 (CAN). The time period to travel from Bombay to Southampton was two weeks. The boat called on the ports of Aden, after going through Suez Canal, Suez, Marseilles, Gibraltar, and Southampton. I had to stay in London for a week because there was no immediate connecting boat; traveled to Liverpool by train to get on S. S. Captain Cook, compared to Strathmore relatively very small boat. It took 6 days to reach Montreal instead of normal 5 days because of a severe storm in Atlantic.I experienced and saw as to what seasickness means and what it does to even experienced boat crew.

In 1958 when my wife Suniti and our four and a half-year old daughter Aruna came by boat to join me in Guelph, their boat was S.S. Iberia coming from Australia; their boat took the same route except it called on Naples, Italy, instead of Marseilles, France. I was teaching at that time in the Deprtment of Physics, Ontario Agricultural College, Guelph, Ontario.

Pay scale at that time, Lecturer $5000-$6000, Department head, $8000-. $9000. At that time Ontario Agricultural College in Guelph was, the Agricultural Faculty of the University of Toronto, before it became University of Guelph.

The initiation process or what is also known as Hazing of the freshmen at the college, lend me into an interesting experience. On the first day of the fall term, two sophomores came to my office and asked the freshman who was with them, to polish my shoes. I had never heard of this process in my university life in India. Of course, I would not allow him to do that. After perusing me and, me denying the polishing, they were very much disappointed and left my office. This is an old British tradition of initiation; we never had it in India. Nowadays, because there were in few incidences fatal cases, most Canadian and American colleges and universities have stopped the initiation, or on some campuses instead, the freshmen are asked to do some kind of social work in the community.

When I arrived at the Hamilton railway station, Dr. R. H. (Dick) Tomlinson at the Nuclear Research Laboratory, at McMaster University, with whom I was going to do research work, came to receive me at the railway station, and while traveling to the Hamilton city destination, mentioned the hill on the left as "Mountain". The name sounded rather strange to me, knowing the elevation of the Parwati hill in Pune.

At that time, in most places in Canada, many families would not lock the front-door of their homes. There were no 400 series (four lanes) highways. Highway 2, which went from Toronto to Montreal, was a two lane highway. It took me about eight hours to go to Montreal from Guelph by my small English Austin car to meet my wife and daughter. There was no Trans-Canada-Highway at that time, going from East coast to West coast of Canada. The gas (petroleum) was 30 cents an Imperial gallon which is a little larger than the American gallon. The air port in Toronto was called Toronto airport. It was named much later as Lester B. Pearson Air Terminal after Canada's prime-minister.

At that time the Indian groceries available wear rice, wheat flour, masoor dal, potatoes, onions, garlic, beans, butternut, spinach, pumpkin. For basan, we used to go to Toronto to buy chickpee flour from Lobardi's Italian grocery shop. Turmeric powder, muster seeds, chilli-powder, bayleaf, table salt, and some other spices, were available in small bottles, as they are still available now. One day, somebody in the department mentioned to me that a grocery store in Stratford, Ontario, had some Indian pickles. Following Saturday, we went to Stratford and got Bedekar's pickles, Mango, Lime and

Chile. Store had them because there were few retired British army officers settled in the area, who bought them on a regular basis.

In the fruit area, apple, pears, peaches, grapes, lemons but not limes; bananas and oranges were rare, available mostly at the Chrismas time.

There were no air-conditioners, automatic washers or dryers; the only washing machine available was hand roller-wringer type. Not many people had television sets.

The cost of a loaf of bread at that time was about 12 cents. The milk containing 0.1 percent, 1.0 percent, 2.0 percent fat was not available. Only milk available was homogenized milk was about 18 cents a quart. This milk contains about 3 percent fat compared to water buffalo's milk which contains about 8 percent fat. In most places milk in glass bottles, cheese, eggs, bread, heavy cream, sour-cream, were delivered to homes by the milkman using the horse carriage, as a means of transportation. He would place your order everyday, in the small cupboard located next to the back door of the house. Butter available at that time was salted; it was not the proper one to make ghee. There were no Indian grocery stores in Toronto or Hamilton area but somehow we managed

In 1965 I bought in St. Catharines, a three bed room bungalow built on a 65ft x 170ft lot with garage, front porch, full basement, fire place, and fruit cellar for $27,500.00, with $3000.00 down payment. We still live in this house, before that for four years, we were renting a three bed relatively much smaller house for $150(CAN) / month rent.

In the back yard, we planted fruit trees: two Apple trees, Ida Red and Northern Spy; one Apricot, one Peach, one Plum and two Pear trees. The Pear trees Bosc and the other Bartel variety were planted much later along the side fence. This is known as Espalier system in which a tree does not grow vertically up and become a big tree but grows on the fence as a vine. We found that the tree in such a system produces limited amount of fruits just enough for a family to enjoy the fresh fruits right from the tree. The work involved in the early spring is pruning, spraying with dormant spray (Mixture of liquid sulfur and mineral oil). When the blossom is over, again spraying with fruit spray. When the fruits are of smaller size in their growth, thinning is required to increase the size of the remaining fruits.

When we bought the house, it had two big trees in the back yard. One was about 40 years old Mountain Ash and the other 70 years old American Elm. In a few years we had to cut down both trees. Mountain Ash died because of lack of proper water supply. When a new development is established by a builder, the water table changes and that affects the previously established trees in the area. The Elm tree died because of Dutch Elm Disease, a virus that came from Europe and spread all over the American Continent. Very few large Elm trees have survived. We planted a hard maple tree in the back yard and a red maple in the front yard. The city planted a Canadian lime (Linden) tree in the city area of the front lawn. Both of these trees are now full grown and give good shade to the front and back yards of the house.

We have two 11ft x 11ft flower beds in the back yard, along with flowerbeds along the three sides of the house. We also have a vegetable garden in which we grow from time to time, Okra (Bhendi), Ridged gourd (Dodaka), Bitter Milan (Karle), Tomato, Eggplant (Wangi of three different types), Peppers (Sweet and hot), Fenugreek grass (Methi), Beans, Coriander (Selanto, Kothimbir), Summer Squash (Dudhi Bhopala), Rhubarb, Cucumbers, Carrots, Butternut Squash, Kohl-rabi (Nawalkol), Aalu (Edo bulbs imported from West Indies). We freeze the produce and store them in the vertical freezer in the basement This storage we use till almost up to the end of the following summer of the following year. In doing all this physical work is involved but we enjoy working in the fresh air. Lately we had to cut down Peach, Apricot and Plum tree, because after 30-35 years their fruit producing life generally ends.

We never used herbicides or any other chemical spray or chemical fertilizer in our vegetable garden. We made our own compost by composting tree leaves that we always collected in the fall and raw vegetable garbage that came from the kitchen. The beauty of the organic compost is, a plant takes the amount of nutrient just enough as required and when it is required.

In the case of most of the vegetables every year, my wife Suniti

grows the seedlings by planting seeds in small plastic containers at the end of February of each year. We get the seeds from the seed catalogues. This is done in the basement under fluorescent lights with the timer to control the time period every day that the seedling is exposed to light. The advantage of growing the seedlings is we can try different varieties of vegetables. The seedlings are transferred to the cold box in about end of April, kept outside the house. Cold box is generally of the size of sandbox with a glass cover. This is done to avoid the shock the plants experience if trans-planted in the vegetable garden.

In winter for many years we had to clear the drive way and the side walks by shoveling the snow by snow shovels; then came scoop to avoid the lifting of the snow and just pushing the snow. In the 70s came the snow blowers.

For First 2-3 years there was no Maha- rashtrian around that we knew of. There were not many Indians in Hamilton or in Toronto. Very seldom one could see an Indian walking along the street of Hamilton or Toronto or any town of Ontario. By accident one day, we came to know that Shri. Ram Tamboli was working as an aeronautical engineer in Toronto at the Boeing aircraft factory. I knew him since my days in Fergusson College; he was senior to me by a few years. After obtaining M.Sc. degree in Spectroscopy from University of Bombay, he had come to State University of Rutgers, N.J. in the United States, for a degree in aeronautical engineering in late 40s (at that time neither University of Poona nor Indian Institutes of Technology did exist). In those days very few Universities in United States and Canada offered a degree in aeronautical engineering. I did not know that he was located in Toronto after obtaining the degree. He is no more with us.

There were some Indian graduate students at our college doing work in Agricultural Engineering, Agricultural Economics, and Soil Science, and time to time, Colombo Plan candidates used to come to the college from different parts of the British Commonwealth.

There was no government health care system; we had to pay the medical expenses on our own. When our son Sanjay was born in 1960, we had to pay for all medical services. After the delivery when my wife came home in three days, she had to get to house work, because a help in the housework is expensive in Canada; of course I helped her and I still do. It was not very common for the parents of the expectant mother to come to Canada or U.S. for help in the house at the time of the delivery, which is common these days. This is not a criticism but an observed fact.

In those days, life in urban and rural Canada was relatively much quieter and safe, than what it is now.

***"Those were the days my friends!!"***

-0-

## LAUGH IT AWAY !!!

Ramakant Vidwans(p.620)

An engineer dies and reports to the pearly gates. St. Peter checks his dossier and says, "Ah, you're an engineer — you're in the wrong place."

So, the engineer reports to the gates of hell and is let in. Pretty soon, the engineer gets dissatisfied with the level of comfort in hell, and starts designing and building improvements. After a while, they have got air conditioning and flush toilets and escalators, and the engineer is a pretty popular guy.

One day, God calls Satan up on the telephone and says with a sneer, "So, how's it going down there in hell?"

Satan replies, "Hey, things are going great. We've got flush toilets air conditioning and escalators, and there's no telling what this engineer is going to come up with next."

God replies, "What??? You've got an engineer? That's a mistake — he should never have gotten down there; send him up here."

Satan says, "No way. I like having an engineer on the staff, and I'm keeping him."

God says, "Send him back up here or I'll sue."

Satan laughs uproariously and answers, "Yeah, right. And just where are YOU going to get a lawyer?"

# ज्योतिषः एक छंद व अभ्यास

लेखिका- सौ. रोहिणी विजय मराठे (पृ. २८८)
११/२ शारदा सेंटर रेसिडेन्सी,एरंडवणे,पुणे ४११००४; F:०२०-२५४४१८०८

हितगुज हे मुखपत्र एक मुक्तपीठ समजून ज्योतिषशास्त्राच्या छंदाबद्दल माझ्या कल्पना लिहीत आहे. छंदाबद्दल लिहिण्यासाठी मला श्री. श्रीनिवास मराठे, पुणे यांनी प्रोत्साहित केले.छंदाबद्दल लिहिण्याचा, तो शब्दबद्ध करण्याचा माझा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे लिखाणात काही चुका झाल्यास वाचक मला क्षमा करतील याची खात्री आहे. ज्योतिष हा माझा छंद असला तरी फावल्या वेळात त्याचा अभ्यास करावा लागतो.

खरे म्हणजे ज्योतिष शिकण्याआधी मी भविष्यकाळात ज्योतिष शिकेन असे वाटले नव्हते. किंवा तसा विचारही मनात नव्हता.पण माझ्या आयुष्याच्या मधल्या काळात आलेल्या संकटांमुळे मला भविष्य विचारायला जावे लागले. साधे सरळ जीवन फारशा मोठ्या अपेक्षा ठेवल्या नसतांना व प्रामाणिकपणे जीवन जगतांना संकटे येऊं लागली याचे कारण जाणून घेण्यासाठी ज्योतिष्याकडे जाऊ लागले. तेंव्हाच मला वाटू लागले की आपण ज्योतिष शिकावे. आमच्या घरापासून जवळच श्री. आठवले यांनी ज्योतिष वर्ग सुरू केला होता. त्यात मी नांव घातले. आठवले सर हे प्राध्यापक होते. रिटायर झाल्यावर ते ज्योतिष शिकले हे कळल्यावर मला वाटले शिक्षणासाठी वयाची अट नसते. शिक्षण कधी संपत नाही.आयुष्यभर आपण काहीना काही शिकतच असतो.तर या वयात आपल्याला ज्योतिष शिकायला काहीच हरकत नाही. व एक छंद म्हणून जोपासायला चांगला विषय आहे. वेळही छान जातो.

आयुष्यात संकटे येत नाहीत ते भविष्य विचारत नाहीत.पण असे लोक थोडेच असतात. संकटग्रस्त लोकांना मानसिक आधार हवा असतो. आलेले संकट काही दिवसानी,वर्षानी नाहीसे होणार आहे हे कळल्यावर त्यांना दिलासा मिळतो. त्यामुळे ते संकटाला धैर्याने तोंड देतात. खचून जात नाहीत. मनाची तयारी करतात. देवाची उपासना करतात.

कोणतीही गोष्ट करताना सामान्य माणसाला मार्गदर्शन लागते ते मार्गदर्शन ज्योतिषशास्त्र करते असे मला वाटते. तरी पण पूर्ण भविष्यावर अवलंबून राहू नये असेही वाटते.कारण भविष्यात घडणाऱ्या गोष्टींसाठी प्रयत्न करावचे लागतात. उदा. परदेशी जाण्याचा योग आहे व तशी संधीही मिळते. तरी पण पासपोर्ट, व्हीसा यासाठी प्रयत्न करावे लागतात. तसेच नोकरी मिळण्याचा योग आहे पण त्यासाठी अगोदर तीन चार ठिकाणी अर्ज भरून द्यावे लागतात. घरी बसून नोकरी मिळत नाही. म्हणजेच भविष्यामुळे मार्गदर्शन होते व त्यासाठी मनुष्य प्रयत्न करतो. निष्क्रिय राहून चालत नाही. भविष्य घडवावे लागते.

प्रत्येकाला आपले घर असावे असे वाटते. त्यासाठी मनुष्य प्रयत्न करतो.भविष्यात घर होणार आहे पण काही काळ थांबावे लागेल असे कळले तरी मानसिक समाधान मिळते. त्या आनंदात माणूस काळ घालवितो. दुसरी बाजू म्हणजे एकादे वेळेस गंडांतर येणार आहे असे कळते त्यासाठी संकटाला सामोरे जाण्याची तयारी करतो. मन घट्ट करतो. संकट टाळण्याचा प्रयत्न करतो.भविष्यात होकार व नकार दोन्हीही असतात. कदाचित नकार जास्तच मिळतात. भविष्यात होकार आपल्याला हवा असतो. तसा भविष्यातील नकार पचवायलाही आपण शिकले पाहिजे.

जीवन हे सुखदु:खाने भरलेले आहे. त्याला सामोरे जावेच लागणार आहे त्यामुळे दु:खातही सुख मानून जीवन जगावे. देवावर श्रद्धा ठेवावी. भविष्यात काहीही घडणार असले तरीआपल्या हातात काही नाही म्हणून ज्योतिषीसुद्धा देवधर्म, व्रतवैकल्य करायला सांगतात.आनंददायी घटना असेल तर आनंद मिळतो. पण दु:खदायक घटना असेल तर दु:ख सुसह्य व्हावे म्हणून देवाची आराधना करावी. ज्योतिष हे जीवनातील चढउतार दाखविते. त्यामुळे मनुष्य सावधपणे वावरतो. हे ज्योतिषाचा अभ्यास करताना जाणवते.ज्योतिषाबद्दल लिहू तेवढे थोडेच आहे. या विषयाबद्दल मोठमोठे ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यामुळे माझे मनोगत मी इथेच थांबवते.

-०-

## नवीन उपक्रमांसाठी आवाहन-१

सी.गो.खांबेटे, सहसंपादक.

### हितगुजची हेल्पलाईन

आपल्या परिवारात अनेक व्यक्ती अशा आहेत की ज्या काही विशेष सेवा, मार्गदर्शन, सल्ला देऊ शकतात. उदा. वैद्यकीय क्षेत्रातले तज्ञ, थेरपिस्ट,वकील, समुपदेशक, लेखा परीक्षक, इन्व्हेस्टमेंट एजंट, वास्तूविशारद इ. आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी अशा सेवा सुविधांची गरज लागते. बऱ्याच वेळा असे होते की आपल्याला हवी असलेली नेमकी मदत कुठे मिळेल हे माहित नसते.

हितगुज ही माहिती देणारा दुवा बनू शकतो. काही व्यक्ती खूप वेगळ्या प्रकारचे कार्य करत असतात. पण बऱ्याच जणाना असे काही काम अस्तित्वात आहे हे सुध्दा माहित नसते.

अशा सर्व व्यक्तींनी हितगुजकडे आपण देत असलेल्या सेवेची माहिती पाठवावी किंवा हव्या असलेल्या सेवेविषयीच्या माहितीसंबंधी **"कुठे? कुणाकडे?"** अशी पत्राने विचारणा करावी. त्यातून **" हितगुजची हेल्पलाईन "** अथवा **"परस्पर सहाय्य योजना"** तयार होईल. किंबहुना आपल्या प्रतिष्ठानच्या ध्येयं धोरणांपैकीचे ते एक महत्त्वाचे अंग आहे.

यामुळे तुमच्या कामाची माहिती परिवारातील सर्वांपर्यंत पोहोचेल व हितगुज खऱ्या अर्थाने संपर्क माध्यम बनेल.परिवारातील व्यक्तींसाठी खास सवलत देऊ इच्छिणाऱ्या सेवादात्यांनी आमचेकडे प्रस्ताव पाठविल्यास त्याना हितगुजच्या माध्यमातुन प्रसिद्धी दिली जाईल.

-०-

### *एखादी तरी स्मितरेषा -२*

As an old man was driving down the freeway, his car phone rang.

Answering, he heard his wife's voice urgently warning him,

"Herman, I just heard on the news that there's a car going the wrong way on Route 280. Please be careful!"

"It's not just one car," said Herman, "It's hundreds of them!"



कै. प्रमोद विष्णू मराठे

# साथ साथ कै.प्रमोद विष्णू यांना भावांजली

श्रीमती अर्चना प्रमोद मराठे (पृ.५१३) चिंचवड, पुणे
✆ : २६८२४६८१

माझ्या प्रत्येक क्षणात
तुझा वाटा अर्धा आहे
भूतकाळ आठवायचा तर
तुझ्या आठवणींची स्पर्धा आहे

नीलांबरीताईंनी त्यांच्या काही आठवणी लिहून द्या म्हटल्यावर वरील कवितेसारखीच माझी स्थिती झाली. त्यांच्याबद्दल पती म्हणून आठवायला लागले तर सुरुवातीपासून अनेक बाबतीत त्यांनी मला गुरूसारखे केलेले मार्गदर्शनच आठवायला लागले. ड्रायव्हिंग, स्वीमिंग हे सर्व तर त्यांनीच मला शिकवले. पण स्वयंपाकघरातले व्यवस्थापन कसे असावे, तसेच स्वयंपाक करताना अष्टावधानी कसे असावे ह्या बाबतीतही तेच माझे गुरू होते. पाच-सहा वर्षांपूर्वी अगदी थोड्या काळापुरता आम्ही केटरिंगचा व्यवसायही केला होता. त्यात मी मोदकांच्या ऑर्डर्सही (नोकरी असताना) घेत असे. त्यामध्ये महत्त्वाचे काम म्हणजे नारळ किसून देणे — ते सुद्धा अगदी भराभर, सुरेख असा कीस ते अंजलीच्या खवणीवर करून देत असत आणि हे सर्व ते आपला प्रिंटिंगचा व्यवसाय व्यवस्थित चालू असताना करत होते.

त्यांची मूळ लाईन फार्मास्युटिकल असताना ते इतर अनेक गोष्टींमध्ये यशस्वीपणे काम करत असत. त्याला कारण म्हणजे त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन आणि रसिक वृत्ती. सर्व गोष्टी ते रस घेऊन करत. त्यांचे वाचनही चौफेर असल्याने कोणत्याही थरातील लोकांबरोबर ते चांगला संवाद साधू शकत होते.

त्यांना प्रवासाचीही फार आवड असल्याने भारतातील अगदी अमरनाथसारखी अवघड स्थळे आम्ही पाहिली होती आणि भारतातील अनेक सौंदर्यस्थळांना आम्ही दरवर्षी जात होतो. ज्या काळात लोक जास्त फिरत नव्हते त्या काळातही आम्ही भरपूर प्रवास केले आहेत आणि ते स्वतः तर त्या काळी युरोप टूरही करून आले होते.

खूप वाचन आणि प्रवास यांमुळे माणूस कसा प्रगल्भ होतो हे मला नेहमी त्यांच्या सहवासात जाणवायचे. या सर्वांचा परिपाक म्हणजे त्यांचा आयुष्याविषयी पॉझिटिव्ह ॲटिट्यूड. या ॲटिट्यूडमुळेच ते ब्लड कॅन्सर सारख्या दुर्धर रोगाशी सुद्धा सुरुवातीपासून लढावू वृत्तीने मी हरणार नाही असे म्हणत लढले.

**ऋणनिर्देश**

कै. प्रमोद मराठे यांनी पुणे शाखेचे मराठे प्रतिष्ठानशी संबंधित जे जे छपाई काम आजपर्यंत करावे लागले ते सर्व त्यांनी केले आहे. पुण्यातील अधिवेशनाची स्वागतिका, आमंत्राणाची अंतर्देशीय पत्रे, आतापर्यंतच्या दोन्ही डायऱ्या, काही निवेदने इत्यादी त्यांनीच छापून दिली आहेत. छपाईचे सर्व काम त्यांनी अतिशय तळमळीने, आत्मीयतेने, अल्प दरात व अगदी कमी वेळात पूर्ण करून दिले आहे.

त्यांच्या या सहकार्याबद्दल म. प्र. पुणे शाखा त्यांची ऋणी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना!

१-११-०७ सौ. नीलांबरी मराठे

-o-

# माहेरच्या आंगणात(२)

स्वाती अभ्यंकर (माहेरची सुनंदा विजय मराठे पृ.१५५) चिंचवड, पुणे

*(मागील अंकापासून सुरु केलेल्या या सदरासाठी अनेक भगिनींनी आस्था दाखविली आहे. मराठ्यांच्या लेकी आणि सुना असलेल्या सर्व भगिनींनी आपल्या स्मृतींच्या कोंदणात हळुवारपणे जपलेले क्षण शब्दबद्ध करून आमचेकडे पाठवावे. अवश्य प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल-आवश्यक वाटल्यास माहेर विशेषांक काढून सुद्धा! तरी भगिनींनो लिहित्या व्हा !!- संपादिका )*

माहेरच्या आंगणात हे नवीन सदर हितगूजनं सुरू करून आम्हा सर्व स्त्रियांचा हळवा विषयच हातात दिला आहे. अहो, माहेर हा शब्दच असा आहे की स्त्रीच वय कितीही मोठं झाल तरी तितकीच ओढ वाटणार अस ते एक स्थळ.

माहेरच्या आंगणाविषयी लिहायच हेच केवढ सुखद आणि आवडीच आहे ते सासरी गेल्यावर कळत. माहेर या शब्दाचा अर्थ माझ्या ह्रदयाच्या कप्प्यात असा आहे की **मा**या **ह**च **र**क्ताभिसरण . **मा-हे-र.**

मन एकदम बालपणाकडे गेल. माझ्या माहेरी अत्यंत प्रेमळ असच वातावरण होत. त्याच कारण आमची आई. तिने सर्वांनाच प्रेमाने गुंफून ठेवल होत. आम्ही तीन भावंड. पण इतके चांगले संस्कार तिने आमच्यावर केले की आमच्यात कधी भांडणच काय पण एकमेकांवर कधी रागसुद्धा आला नाही. तस सर्वसाधारणच गेल बालपण. कारण वडील (नाना) एकटे मिळवणारे व आम्ही दहा माणसे, त्यामुळे जरा ओढाताण होत होती. पुणं हे विद्येच माहेरघर म्हणून शिक्षणासाठी मावस, आते, चुलत असे भाऊदेखील आमच्याकडेच रहायला होते. आमच घर छोटस होत. पण माझ्या आईवडिलांच मन मोठ होत. आईसुद्धा तिच्यापरीने संसाराला मदतीचा हात देत होती.

माझ बालपणच काय, अहो लग्नापर्यंतच आयुष्य हे ऊबदार अशा वाडासंस्कृतीत गेल. आम्ही पुणेरी म्हणजे वाडा असणारच. भरपूर मैत्रिणी होत्या. पण तुझ-माझ नव्हत. एकमेकांविषयी आपुलकी होती. ओढ होती. आम्ही सगळ्याजणी मिळून सर्व खेळ एकत्र खेळायचो. पौर्णिमेच्या रात्री आमची अंगतपंगत असायची. उन्हाळ्याच्या सुट्टीत पत्ते, गाण्यांच्या भेंड्या व इतरही मजेशीर खेळ खेळत होतो. पहाटे पर्वतीला जाण हा हल्लीच्या शब्दात सांगायच तर मॉर्निंग वॉक होता. सगळ्यात आवडणारा म्हणजे भोंडला. काय मजा यायची. सगळ्यांच्या वेगवेगळ्या खिरापती असायच्या. गणपतीत सर्वांच्या घरच्या आरतीला जायच. दिवाळीत शेणाने सारवलेल्या अंगणात मोठ्या मोठ्या ठिपक्यांच्या रांगोळ्या, रंगपंचमी असे सर्वच सण छानच व्हायचे.

त्या काळात कोणीही काहीही दिलं तर त्याची किंमत किंवा क्वालिटी पाहिली जायची नाही. त्यामागचं जे प्रेम होतं ते फार सुखावून जायचं. एकमेकांच्या सुखदुःखात एकच असायचं. वाडा संस्कृती खूप काही शिकवत असते. प्रेम हे वाटायचं असतं. आणि एकोपा वाढवायचा असतो. हे इथेच पहायला मिळतं. नाहीपेक्षा आजकालच्या ह्या सिमेंटच्या जंगलात मनात आणि वातावरणात सुद्धा एकदम रुक्षता आहे. आम्ही सर्वजण लहानाचे मोठे एकमेकांच्या हातात हात घालूनच झालो.

एक ह्या सदराच्या दृष्टीने महत्त्वाचं असं की माझं लग्नसुद्धा नारायण पेठेतल्या माहेर मंगल कार्यालयात झालं. म्हणजे माझी खरोखरच माहेराहून सासरी पाठवणी झाली.

*(पुढील मजकूर पृ.१९वर)*

# श्री दत्तात्रेय जन्माख्यान संत एकनाथ महाराज विरचित

-डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे

(महाराष्ट्रातील एक प्रमुख उपासना म्हणजे दत्तोपासना. महाराष्ट्रात घरोघरी दत्तोपासना होतांना आढळते. गुरुवारी श्रीदत्तात्रेयांच्या भजनाचा, उपासनेचा कार्यक्रम नेहमी होत असताना दिसतो. 'तीन शिरे सहा हात तया माझा दंडवत' अशा थाटात श्रीदत्तात्रेयांची अनेक सुबक व रंगीत प्रकाशचित्रे घरोघरी दिसतात. श्रीगुरुदेवदत्त या गुरुतत्त्वाचा आविष्कार त्यांच्या रूपात पाहावयास मिळतो. रविवार दि. २३ डिसेंबर २००७ रोजी मार्गशीर्ष पौर्णिमेस श्रीदत्तजयंती आहे. त्या निमित्ताने डॉ. सुमेधा मराठे यांचा संत एकनाथ महाराजकृत श्रीदत्तात्रेय जन्माख्यान हा लेख सादर करीत आहोत.-सहसंपादक)

श्री एकनाथ महाराजांनी ६७ ओव्यांमध्ये 'श्रीदत्तात्रेयजन्म हे आख्यान रचले. या आख्यानाचा प्रारंभ असा-

ऐका दत्तात्रय-आख्यान।
पार्वतीस सांगे त्रिलोचन।।

याप्रमाणे प्रारंभीच कथाविषय स्पष्ट करून शिवपार्वतीच्या संवादातून हे आख्यान त्यांनी कथन केले आहे. पार्वती शिवाला म्हणते-

आम्हा तिघीवरती त्रिभुवनी।
श्रेष्ठ कोणी असेना।।२।।

ही पार्वतीची गर्वोक्ती ऐकल्यानंतर शिवाने पार्वतीला सतीमहिमा विशद करण्याचे कार्य नारदावर सोपविले. नारद पार्वतीला म्हणतात-

एके पार्वती चित्त देऊनी।
अनुसूया अत्री पत्नी।
तुम्हा तिघीहूनी पतिव्रता।।६।।
तुम्हा तिघींचे पुतळे करुनी।
बांधले असे वामचरणी।
असंख्य सामर्थ्य त्रिभुवनी।
समतुल्य कोणी असेना।।७।।

याप्रमाणे सती अनुसूयेची श्रेष्ठता दाखवून नारदांनी पार्वतीचा अहंकार चांगलाच जागृत केला आहे.नारदाला ती यावर उपाय विचारते, तेव्हा नारद तिला सुचवितात की शंकराची प्रार्थना करून त्याला अनुसुयेकडे पाठवावे आणि तिचे सत्त्वहरण करावे. याप्रमाणे कळ लावून नारद वैकुंठ गाठतात. वैकुंठात नारदाने लक्ष्मीला सति अनुसूयेची महती सांगितल्यावर तीही पार्वतीप्रमाणेच दुःखी कष्टी बनते, तिचा गर्व उफाळून वर येतो.

ऐकोनी तटस्थ झाली रमा।
आता काय करू पुरुषोत्तमा।
मजहूनी वाढे ऐसी सीमा।
ते कैसोनि निरसेल।।१३।।

नारद तिलाही पूर्वीप्रमाणेच सल्ला देतात. श्रीविष्णूला अनुसूयेकडे पाठवावे आणि तिचे सत्त्वहरण करावे.मग नारद आपला मोर्चा सावित्रीकडे वळवितात.सावित्रीही गर्वाने फुगून म्हणते,

पाहतां आम्हापासुनी ।
एवढी काय तिची स्थिती।
टिटवी काय समुद्राप्रती।
शोखूं शके? ।।१८।।

पतीच्या कर्तृत्वाचा अभिमान पत्नीने बाळगावा या न्यायाने सत्यवतीचा हा अहंकार स्त्री-स्वभाव-सुलभच वाटतो. शेवटी सत्यवतीही नारदाला उपाय काय विचारते. नारदही तिला लक्ष्मी व पार्वती या दोघींना सुचविलेला उपाय सांगून आपले कार्य साधून निघून जातात. नारद गेल्यावर तिघीही आपापल्या पतीला प्रार्थना करतात आणि त्यांना अनुसुयेची परीक्षा पहाण्यासाठी सत्त्वहरण करण्यासाठी सक्ती करतात.

मग पवनवेगे ते अवसरी।
तिघे प्रवेशिले आश्रमाभीतरी।
वाहने ठेवुनिया दुरी।
माध्याह्नकाळी पैं आले।।२५।।

याप्रमाणे वायुवेगाने तिन्ही देव अत्री ऋषींच्या आश्रमात आले. देव आश्रमात येताच अत्रिऋषीने अनुसूयेला त्वरित बाहेर बोलावून यथासांग पूजन केले आणि आगमनाचे कारण विचारले तेव्हा तिन्ही देव म्हणतात,

ते म्हणे अनुसूयेसी ।
तू पतिव्रतेमाजी क्षेष्ठ म्हणविसी।
तरी मागतो ते देई आम्हांसी।
म्हणोनि भाके सी गोविले।।२९।।

त्यांच्या येण्याचा हेतू ऐकिल्यावर अनुसूयेने केलेले त्यावरचे भाष्य मोठे



लक्षणीय आहे.

तुमचे देणे त्रिजगती।
आणि तुम्ही मागता मजप्रती।।३०

त्रिजगताला देणे देणाऱ्याने याचक बनून अनुसूयेकडे यावे यातील विरोधाभास एकनाथांनी मोठ्या कुशलतेने टिपला आहे. तरीही इच्छा जशी असेल तशी मागणी करण्याची विनंती अनुसूया करते. तेंव्हा देव म्हणतात-

देव म्हणती, होऊनी नग्न ।
आम्हासी घालावे भोजन।।३१।

इतकी विकृत आणि महाभयंकर मागणी देवांनी केली असता अनुसूया क्षणभरही विचलित होत नाही. तर तिने ती विचित्र मागणी तात्काळ मान्य केली आहे यातून अनुसूयेच्या सती श्रेष्ठत्वाची साक्ष पटून पुढील कथा भाग एकदम चमत्काराच्या आणि अद्भुततेच्या दैवी पातळीवर जातो. त्यामुळे भाविक श्रोत्यांच्या मनात भक्ति भावनेचा उद्रेक होतो. अनुसूया नग्न होऊन त्याना भिक्षा घालणार तोच सतीच्या पातिव्रत्याच्या महिम्यामुळे चमत्कार घडतो!

ठेवूनिया तिघांचे मस्तकी कर।
तंव ते तिघे झाले कुमर।
करवी स्तनपान तयांतें।।३२।।

बाळरूपात आलेल्या ब्रह्मा-विष्णू-महेशांची याप्रमाणे उदरतृप्ती करून 'वसन नेसली शीघ्रगती' असे वर्णन करून एकनाथांनी प्रसंग त्वरेने गुंडाळून टाकला आहे. कदाचित नाथांच्या संस्कारक्षम, भक्तिप्रवण मनाला या ठिकाणीची अश्लीलता जाणवली असावी. या वर्णनामुळे श्रोत्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम होईल असेही त्यांना वाटले असावे! भविष्य पुराणात, याप्रसंगी वर्णिले जात असलेले अत्यंत अश्लील वर्णन नाथांनी पूर्णपणे वगळून टाकले आहे, हे लक्षात घेणे जरूरीचे आहे. एकनाथ हे सुसंस्कृत मनाचे संत होते, सुसंस्कृत भक्त होते तसेच कवीहि! पुढील प्रसंगचित्रणात नाथांनी, तिन्ही देवांनी केलेल्या जगतोद्धाराची महती गायिलेली आहे आणि अनुसूयेच्या सतीत्वाचा महिमाही वर्णिला आहे. अनुसूया प्रथम ब्रह्माला पाळण्यात घालून म्हणते,

मग म्हणे चतुरानना।
जो जो जो रे सगुणा।
उत्पन्न करुनी त्रिभुवना।
बहु श्रम पावलासी ।।३४।।
याकारणे केले बाळ।
आता राहिले कर्तृत्व सकळ।
स्तनपान करोनि निर्मळ।
सुखे निद्रा करावी।।३५।।

तसेच श्रीविष्णूला ती म्हणते,

जो जो जो रे श्रीलक्ष्मीपती।
तुझी तंव अगाध कीर्ती।
अवतार धरूनी पंक्ती।
दुष्ट संहार पै केले।।३६।।
ते श्रम पावलासी थोर।
निद्रा करावी बा सत्वर।
म्हणोनि केला कुमर।
विश्रांती सुख पावावया।।३७।।

त्याचप्रमाणे ती शंकरास म्हणते,

जो जो जो जोरे बा शंकरा
महादेवा पार्वतीवरा ।
करोनी दुष्ट संहारा।
बहू श्रम पावलासी ।।३८।।
तरी आता सुखे निद्रा करी।
कुमारत्व पावले यावरी।
आतां क्लेश नाही तरी।
पालखी भीतरी पहुडावें।।३९।।

याप्रमाणे अनुसूयेने तिन्ही देवांना पाळण्यात घालून, अंगाई गीत गाऊन

*(पुढील मजकूर पृ. २१ वर)*



# लाडक्या लेकीची पाठवणी

लेखिका- सौ.राधा श्री.मराठे
ई २०३-२०४, कांचनजंगा, शिवानंद गार्डन्स, सर्व्हे ३८/१, कोथरुड, पुणे ४११ ०३८.
पुणे ✆ : ०२०-२५३८६७६९; मुंबई ✆ : ०२२-२६३०४५२२; सेल-९८५०४३३६३१;

*(सासरी जाणाऱ्या मुलीला कसे वागावे त्याचे धडे आईने द्यावे ही आपली परंपरा. पण तरुण पिढीच्या बदलत्या मानसिकतेचे भान ठेवून सासरच्या मंडळींना कराव्या लागणाऱ्या तडजोडीची कल्पनाही द्यावी हे सुचवण्यासाठी हे लेखन. ही संहिता पुणे आकाशवाणीच्या 'स्नेहबंध' कार्यक्रमातून सादर झाली आहे. सौ .राधा मराठे ह्यांचे हे उत्तम आशयघन पत्र प्रत्येक गृहिणीने इतकेच नव्हे तर घरातील सर्व मंडळींनी अवश्य वाचावे अशा योग्यतेचे आहे. पत्र वाचून संबंधितांच्या परस्परव्यवहारातील समजूतदारपणा थोडा तरी वाढेल अशी अपेक्षा. सौ.राधा मराठे काही महिन्यांसाठी पुहा मुंबईनिवासी झाल्या आहेत -संपादिका)*

चि.मधुरास,

कालच तुझा साखरपुडा झाला. आता मुहुर्त काढला की लग्नाची तारीखही ठरेल. लवकरच तू सासरी जाशील. तुझे लग्न जरी मिलिंदशी होणार असले तरी त्याच्या घरात इतरही माणसे आहेत, लग्नानंतर तू त्याच्या संपूर्ण कुटुंबाशी कोणत्या ना कोणत्या नात्याने बांधली जाणार आहेस; मी आणि माझा नवरा म्हणजेच माझे कुटुंब असे म्हणून चालणार नाही. म्हणून हे हितगुज!

लग्नाच्या वेळी तुम्ही मुली उच्च-शिक्षित असता. कदाचित त्यामुळेच स्वत्वाची आणि स्वतःच्या योग्यतेची तुमची जाणीव जरा जास्तच प्रखर असते. वाढलेल्या वयामुळे तुमची मते घट्ट रुजलेली असतात. आजुबाजूला घडणाऱ्या घटनांची सहज प्रतिक्रिया म्हणून तुम्ही जरा जास्तच आक्रमक पवित्र्यात असता. पुरूषाच्या नैसर्गिक चढ्या स्वभावाला त्याचे शिक्षण, समाजातले वातावरण आणि आपल्या पुरुषप्रधान परंपरा यांनी खतपाणी घातलेले असते. अशा वेळी माघार कुणी घ्यायची, तडजोड कुणी करायची यावर नवा वाद उभा राहतो.

जमाना समान हक्कांचा आहे हे खरंच. पण हे समान हक्क कुठे, कसे राबवायचे त्याचे तारतम्य सुटत चालले आहे की काय याची भीति वाटावी अशी परिस्थिती आजुबाजूला आहे. सासरी कसे वागावे याची कल्पना तुला मी देणार तसंच बदलत्या काळाचं भान ठेवून मिलिंदच्या आईनेही त्याला चार गोष्टी सांगितल्या असतील याची खात्री बाळग. त्यांचे आई-मुलाचे नाते जुने आणि नैसर्गिक आहे, तुझे नवे आणि जोडलेले आहे. सुरुवातीला तुला सासुबाईंच्या वागण्यात थोडा तर-तम भाव जरी जाणवला तरी त्या तसे जाणून बुजून करीत आहेत असे गृहीत धरून सतत हातात कायद्याचे पुस्तक आणि न्यायाचा काटा घेऊन बसू नको. त्यांना थोडा वेळ दे. भांडून मिळवलेले हक्क आणि प्रेमाने मिळवलेला सन्मान यातला फरक ओळख. सासरची माणसे नेहमी तुझ्या विरुद्धच बोलणार, आपल्या मुलाचीच बाजू घेणार असा पूर्वग्रह मनात ठेवू नको. तुझ्या शिक्षणाचा उपयोग तुझी दृष्टी अधिक निर्मळ आणि निकोप होण्यासाठी होऊ दे. मुख्य म्हणजे तुमच्या घरातल्या साध्या समस्येवर मोकळी चर्चा करून तुमचे तुम्हीच उत्तर शोधा. माझ्याकडे तक्रारी आणायची सवय लावून घेऊ नको.

तू तुझं सवयीचं माहेर सोडून सासरच्या घरी जाणार आहेस. तुला तिथे रुळायला वेळ लागेल, थोडा त्रासही होईल. पण तुला त्यांच्या घरात रुळवून घ्यायला त्यांनाही काही तडजोडी कराव्या लागणारच आहेत हे लक्षात घे. एक संपूर्ण वेगळ्या वातावरणातील आणि संस्कारातील व्यक्ती नव्याने घरात येऊन हक्काने वावरायला लागली तर त्यांनाही त्यांच्या सवयी बदलाव्या लागतीलच ना? अगदी रोपाचा लोकप्रिय दृष्टांत घ्यायचा म्हटला तरी रोप कलम करतांना ते रुजायला वेळ लागतो, तसा झाडालाही ते कलम स्वीकारायला वेळ लागतोच ना! आजपर्यंत घरात तुझ्या सासुबाई एकहाती सगळे व्यवहार पार पाडीत होत्या. पण आता त्यांना तुझ्या आवडी-निवडी, सवयी, अपेक्षा यांचा विचार करावा लागेलच. अगदी भाजी कुठली करायची, वरण मुगाच्या डाळीचं करायचं की तुरीच्या डाळीचं इतक्या साध्या गोष्टीतही. घरात तरूण मुलगी वावरते आहे म्हटल्यावर तुझे सासरे, दीर यांच्या मोकळ्या वागण्या-बोलण्यावरही बंधनं येणारच ना. तुझ्या सुट्टीच्या दिवशी तू इकडे न धावता घरीच राहिलीस तर तुम्ही एकमेकांना लवकर आणि सहज ओळखीचे व्हाल.

तू आता त्यांच्या कुटुंबाची एक सदस्य होशील. महत्त्वाच्या निर्णयात तुझेही मत विचारले जाईल. पण ज्या गोष्टींना काही पूर्व घटनांचे संदर्भ आहेत तिथे ते शक्य होणार नाही आणि घरात आल्या-आल्या तुला सर्व गोष्टी माहीत झाल्याच पाहिजेत असा हट्ट तूही धरू नको. थोडा काळ जाऊ दे, स्वतःला आणि त्यांना नव्या नात्यात मुरायला थोडा वेळ दे. मग आपोआप सगळे तुला समजत जाईल. घराबाहेर तू उच्च पदावर काम करते आहेस, पण घरात मात्र तू मॅनेजमेंट ट्रेनी आहेस असेच समज. योग्य वेळी, पुरेशा अनुभवानंतर तुला प्रमोशन मिळेलच.

मिलिंदला बहीण नाही. तरूण मुलींचे विचार, गरजा, सवयी यांची तुझ्या सासुबाईंना काहीच कल्पना नसेल. अचानक एका रात्रीत ते त्यांना कळणारही नाही. पण ते समजून घ्यायला तूच त्यांना मदत करायला हवीस. तुम्ही

एकमेकींना समजून घेतले तर तुमचे नाते हळूहळू रुजत फुलत जाईल. त्यासाठी तुम्ही एकमेकींना आई किंवा मुलगी मानायची काहीच गरज नाही. चांगले आणि प्रेमाने वागण्यासाठी असा मानलेल्या नात्यांचा आधार कशाला? सासू-सुनेचे नाते त्याशिवायही मधुर, आनंददायी करता येते.

तू आम्हाला सोडून सासरी जाशील, आपल्या नात्यात थोडा अंतराय निर्माण होईल. पण तुझ्याशी जन्माचे नाते जोडल्यानंतर मिलिंदचे त्याच्या कुटुंबाशी असलेले नातेही थोडे बदलेलच. ते स्वीकारायला, पचवायला मिलिंदला आणि त्याच्या घरच्यांना थोडा वेळ लागेल. लग्न झाल्या-झाल्या लगेच मिलिंद आणि तुझे वेगळे जग निर्माण होईल अशा कल्पनांत रमू नको. कालपर्यंत मिलिंदची कामे, त्याचे खाणे-पिणे, इतर गोष्टी त्याची आईच बघत होती. एका रात्रीत सगळा चार्ज तुझ्याकडे येईल अशी अपेक्षा करू नको. सवयीने हळू हळू हे होईल. तुझ्या ऑफिसात नाही का, नवीन कामाचा चार्ज घेतल्यावर तुमच्या वरीष्ठ, अनुभवी सहकाऱ्यांची मदत तुम्हाला लागतेच कामात रुळायला. तसंच समज.

तुझ्या गुणांचे रास्त कौतुक त्या घरात होईलच. पण सतत कौतुकाची अपेक्षा मात्र ठेवू नको. सारखं गोड-गोड बोलणे, चुकलं तरी 'असू दे' म्हणणे हे केवळ सिनेमा-मालिकांतच शोभून दिसते. कारण तिथे त्यांच्या घरातलं वातावरण सर्व थरातल्या प्रेक्षकांच्या मनावर एकाच वेळी ठसवायचे असते. पण आपल्या रोजच्या आयुष्यात तसे नसते. तेव्हा कौतुकाबरोबर टीका सहन करायची आणि स्वतःत सुधारणा करायची तयारी ठेव.

लग्नाच्या दिवशीच संध्याकाळी किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी, पाहुणे-रावळे घरात असतांना हनीमूनला जाण्याचा किंवा लग्नाची रात्र एखाद्या पंचतारांकित हॉटेलमध्ये घालवण्याचा फिल्मी उतावीळपणा तुम्ही करू नये असे मला सुचवावेसे वाटते. आजकाल बऱ्याच घरात नव्या जोडप्याला लग्नाच्या दिवशीच स्वतंत्र खोली देण्याचा समंजसपणा दाखवतात. सहजीवनाची सुरुवात चांगली होणे मंहत्वाचे. कुठे, कधी या व्यावहारिक गोष्टींना अतिरेकी महत्त्व द्यायलाच हवे का?

बाळाच्या आगमनानंतर त्याचे प्रत्यक्ष संगोपन शक्य तितके तूच करावेस. तू जितकी बाळाच्या जास्त सहवासात राहशील, तितके तुमचे नाते अधिक घट्ट होईल. केवळ जन्म दिला म्हणून आई-मुलात प्रेम निर्माण व्हायला आपले आयुष्य म्हणजे सिनेमा नाही. सहवासाच्या खतपाण्यानेच हे नाते जोपासावे लागते. अडी-अडचणीला, बाळाच्या आजारपणात तुझ्या सासुबाई-सासरे आणि आम्ही आहोतच तुझ्या पाठीशी. नातवंड हा आमच्याही निर्मळ आनंदाचा ठेवाच असेल. तुझं बालपण आम्ही पुन्हा एकदा अनुभवू.

पुष्कळ बोलायचे आहे. एका पत्रात ते संपणार नाही. नव्या घरातले तुझे नवे जीवन आणि नवे नातेसंबंध सुखाचे होवो हाच तुला आमचा उभयतांचा आशीर्वाद.

तुझी
सौ. आई.

-०-

## कै. चिंतामण बळवंत स्मृतीदिनाप्रित्यर्थ निबंध स्पर्धा २००८

श्री. गजानन बळवंत मराठे, प्लॉट नं. ३४ अ, सार्थक, सेनादत्त कॉलनी, पुणे ४११ ०३० (फोन- ०२० २४५३१६५९) यांनी त्यांचे तीर्थरूप कै. चिंतामण बळवंत यांच्या १३-७-९४ या स्मृतीदिना प्रीत्यर्थ गतवर्षी हस्ताक्षर स्पर्धा आयोजिली होती. त्याचप्रमाणे ह्या वर्षी त्यांनी विविध वयोगटांसाठी निबंध स्पर्धा जाहीर केली आहे. स्पर्धेची माहिती, नियम इ. खालीलप्रमाणे आहेत.

१. **पात्रता-** मराठे प्रतिष्ठानची कोणतीही व्यक्ती किंवा मराठ्यांची माहेवाशीण व तिचा परिवार.

२. **पुढील चार गटात विभागणी:** (१) शालेय गट (२) युवा गट (कॉलेज गट) (३) मध्यम गट- वय २१ ते ५९ व (४) प्रौढ गट-(ज्येष्ठ नागरिक) वय ६० पासून.

३. **बक्षिसे** - प्रत्येक गटास ३ बक्षिसे-अनुक्रमे रु. २५०, १५० व १००.

४. **निबंधाची शब्द मर्यादा** -७५०शब्द (अंदाजे फुल स्केप पेपरची दोन पाने.)

५. **महत्त्वाची सूचना** - प्रत्येक स्पर्धकाने आपला निबंध काळ्या शाईत पेनने किंवा बॉलपेनने लिहावयाचा आहे. अन्य रंगाच्या शाईतील लिखाणाचा विचार केला जाणार नाही.

६. **आपला गट क्रमांक व जन्मतारीख** प्रत्येक स्पर्धकाने लिहिणे बंधनकारक आहे.

७. **स्पर्धेची अंतिम तारीख** २८-१-२००८ आहे.
**स्पर्धेचा निकाल** फेब्रुवारी २००८मध्ये जाहीर केला जाईल. मार्च २००८मध्ये संबंधितांना बक्षिसे पाठविली जातील व निकाल हितगुजच्या मार्च २००८ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

८. **स्पर्धेच्या निबंधांचे विषय** पुढीलप्रमाणे आहेत.
(१)शालेय गट: १.शाळेचा पहिला दिवस. २. माझा महाराष्ट्र. ३. माझे छंद.
(२)युवा गट: १.माझ्या कॉलेजचा पहिला दिवस. २. माझा आवडता खेळ. ३.अखिल भारतीय विद्यार्थी परिषद-माहिती व आवश्यकता.
(३)मध्यम गट: १.आमच्या लग्नाची गोष्ट.२.आमचा प्रेमविवाह ३.महागाई-एक समस्या.
(४)प्रौढ गट: १.माझा परिवार. २.वृद्धांच्या समस्या व उपाय योजना. ३.मराठी चित्रपट,नाटके- काल आज व उद्या. ४.मोबाईल- गरज की फॅड?

९. स्पर्धेत आलेले निबंध तज्ज्ञ लेखक-परीक्षकांकडून तपासले जातील.

१० निबंध पाठविण्याचा पत्ता-श्री.गजानन मराठे, प्लॉट नं.३४ अ,सार्थक,सेनादत्त कॉलनी, पुणे ४११०३०



# सलाम! सलाम! सलाम!

सुनीती मराठे, ७, तरलिका, २ रा मजला, २१६, सर भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९. ✆ : २४१४१८७६

(कितीही संकटे आली तरी अंगभूत स्थितिस्थापक प्रवृत्तीमुळे 'मुंबईकर' कोणताही प्रसंग निभावून नेतो या गुणाची कदर करणारी ही कविता दादर भगिनी समाजाच्या 'ज्योती' या वार्षिक हस्तलिखित नियतकालिकात गतसाली पारितोषिकाने गौरविली गेली होती.-संपादिका)

मुंबईकरा , तुला त्रिवार सलाम

मुंबईला माणसे घरी येईपर्यंत,
गृहिणीच्या नसतो जिवात जीव
आजचा क्षण साजरा करा,
उद्याचा काय भरोसा धरा?
कधी कुणी संघटना, देते बंदची हाक,
दुकाने बाजार बंद धडाधड,
दगडफेक माणसांवर
बसेस, मोटारी टाकतात जाळून,
रेल्वे धरतात रोखून,
वाहतूक थबकते जिथल्या तिथे,
तुला घरं गाठावे लागते पदयात्रा करून
आया, बहिणी, वृद्ध, अपंग
यांचे होतात हाल अपार
तरी तू करतोस यावर मात,
सलाम! सलाम! सलाम!
मुंबईकरा , तुला त्रिवार सलाम!

कधी होतात बॉम्बस्फोट,
उध्वस्त होते जनजीवन
आता आहे तर क्षणात नाही,
किती हे क्षणभंगूर जीवन
आपले-परके, गरीब-श्रीमंत,
सवर्ण-दलित, हिंदू-मुस्लीम
सगळ्यांचीच होते राखरांगोळी,
द्वेषाच्या धगधगत्या अग्निकुंडात
तरीही तू सरसावतोस,
दु:खितांच्या मदतीला
अश्रू पुसतोस, सांत्वन करतोस,
रात्रंदिवस सेवा करतोस
नात्याचे ना गोत्याचे,
त्यांना स्वत:चे रक्त देतोस
दुसऱ्या दिवशी सकाळी उठून,
कामावर आपल्या हजर होतोस.
सलाम! सलाम! सलाम!
मुंबईकरा, तुला त्रिवार सलाम!

कधी होतो वादळी पाऊस,
मुंबई होते जलमय
घराघरात पाणी शिरते,
जीव मुठीत धरून रात्र सरते
गाडगी-मडकी वाहून जातात,
कुणाचे तर जिवलग सुद्धा दुरावतात
कामावरून परतताना,
वाहतूक सगळी बंद असते
तुला मात्र चालत चालत,
घर गाठण्याची ओढ असते
या प्रलयातून वाचण्यासाठी,
एकमेकांना आधार देतोस
काडी काडी जमवुन पुन्हा,
परत ताठ उभा राहतोस
राखेतून उठणाऱ्या फिनिक्स पक्षासारखी
मुंबई परत सुरळीत होते.
सलाम मुंबईकरा,
तुझ्या धैर्याला सलाम,
तुझ्या जिद्दीला सलाम,
तुझ्या शौर्याला सलाम,
तुझ्या सोशिकतेला सलाम,
तुझ्या चिकाटीला सलाम,
मंत्री, पुढारी सगळेच
करतात तुला सलाम,
सलाम! सलाम! सलाम!
मुंबईकरा तुला त्रिवार सलाम!

वेड्या माणसा,पण या सगळ्याला
तूच ना जबाबदार?
पहिला दगड तूच फेकतोस,
बसेस, गाड्या जाळून टाकतोस,
रेल्वे वाहतूक तूच तर रोखतोस.
भ्रष्टाचार तूच करतोस,
नदीनाल्यांवर, समुद्रावर
अतिक्रमणही तूच तर करतोस!
शिस्त नाही मुळीच तुला,
घरातला कचरा रस्त्यावर लोटतोस,
प्लास्टिक पिशव्या, बाटल्या वापरून,
कुठेही त्या फेकून देतोस
तुझ्यातलेच चुकले फकीर,
दहशतवाद पसरवतात,
बॉम्बस्फोट घडवतात, दंगे उसळतात
यात सगळे सामान्यच बळी पडतात
मृत्यूला नसते जात-पात,
जाणत नाही तो धर्म,
काहीही झाले तरी,
नुकसान फक्त तुझेच होते.
लांबूनच तुझ्या शौर्याला,
करतात सगळे सलाम.
संकटात एक होणारा तू,
एरवी आपल्यातच दंग असतोस,
कुठेही काही घडले तरी,
मला काय त्याचे? म्हणत पुढे जातोस.
कुणी म्हणतात मुंबईचे शांघाय करू,
कुणाला हवे असते सिंगापूर.
बाहेरून रोज लोंढे येऊन,
माणसांचा आलाय महापूर,
हे सगळे बदलून टाक,
स्वच्छ, सुंदर, हरित मुंबई,
पुन्हा एकदा, कर साकार,
तूच हो, तुझ्या जीवनाचा शिल्पकार.
कलियुगात या,
देव नाही घेत पृथ्वीवर अवतार,
आता तरी जागा हो,
तुझा तूच कर उद्धार.
मुंबईकरा, मग सगळे करतील तुला सलाम,
सलाम! सलाम! सलाम!
मुंबईकरा तुला त्रिवार सलाम!

-o-

### एखादी तरी स्मितरेषा -३

Customer: If I post this letter tonight, will it get to Delhi in two days time?

Post Master : Yes sir, it definitely will.

Customer : I bet you, it won't.

Post Master : Why not?

Customer : It's addressed to Mumbai.

(प्रतिष्ठानवृत्त पृ. ३ वरून)

विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून टाळ्यांच्या कडकडाटात पारितोषिके घेऊन कार्यक्रम उत्तम रितीने पार पाडला.

त्यानंतर श्री भाऊ मराठे यांनी त्यांचा भाऊचा धक्का हा लोकप्रिय मनोरंजनपर कार्यक्रम सादर केला. सर्वांना मनसोक्त खो खो हसविले. वेळ कसा मजेत हास्यविनोदात गेला ते कळलेच नाही. त्यानंतर खुसखुशित, चटपटित अल्पोपहार शेवटी आइस्क्रीमने कार्यक्रमाची सोंगता झाली.

हा कार्यक्रम कै. सुरेशभाऊ स्मृति कार्यक्रम म्हणून साजरा केला जात असून श्रीमती सुलभाताई व कुटुंबीय मंडळी आवर्जून उपस्थित होती.

-०-

## मदतीसाठी आवाहन

मानव मित्र फाउंडेशन या संस्थेतर्फे सर्व मराठे कुटुंबिय सभासदांना अभिवादन.

ही संस्था जुलै २००४ पासून अत्यंत छोट्या प्रमाणात परंतु नियमितपणे अनेक सण उत्सव व राष्ट्रीय दिन इ.प्रसंगी वेळोवेळी काही समाजोपयोगी कार्यक्रम करत आहे. दरवर्षी ज्यांना सहाय्य केले जाते अशांमध्ये बालसुधारगृह (मुले २५०), सन्मति बालनिकेतन (मुले ३५), गोकुळ (मुले ५३), गेल्या वर्षी स्वरूपवर्धिनी आनंदाश्रम (भोर),आलेगांवकर कन्याशाळा अशा संस्थांना व गरजू व्यक्तींना विविध प्रकारे सहाय्य करीत आहेत.

मात्र आर्थिक सहाय्याच्या अभावि नियोजित वृद्धाश्रम व बालसंस्कार केंद्राचे काम होऊ शकले नाही. तरी आपण सर्वांनी सहाय्य केल्यास हे केंद्र उभे राहील याची खात्री आहे. तरी यथाशक्ती मदत करावी ही विनंती.

आपला विश्वासू
मीननाथ लक्ष्मण मराठे (पृ.२८०)
संस्थापक सदस्य, मानव मित्र फाउंडेशन , पुणे
संपर्क-सेल:९८२३७९१४१४
(सकाळी ९ ते १२)
पत्ता: ४१/७५८,लोकमान्य नगर,नवी पेठ, पुणे ४११०३०

**जून ते नोव्हेंबर २००७ या सहामाहीत प्रतिष्ठानला मिळालेल्या रकमांचा तपशील.**

| पावती.क्र. | देणगीदार | | हेतू | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| मुं. १६८३ | श्री.प्रभाकर दा. मराठे (पृ.१२०) | वडाळा | हितगुज जाहिरात(जून ०७) | ६०० |
| मुं. १६८४ | श्री.मोहन स.मराठे (पृ.३६५) | खार | हस्ताक्षर स्पर्धा प्रायोजक | ३०० |
| मुं. १६८५ | श्री.रोहित/रूपाली विद्वांस(पृ.६२३) | कॅनडा | आश्रयदाता शुल्क | १,००० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | ३,५०० |
| मुं. १६८६ | श्री. अमोल विजय विद्वांस(पृ.६२३) | चेन्नई | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मु. १६८७ | श्री.सतीश यशवंत मराठे,(पृ.३७२) | ठाणे | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| | | | दैनंदिनी शुल्क | १०० |
| | | | हितगुज निधी | ६०० |
| मुं. १६८८ | श्री. नितीन जयंत विद्वांस(पृ.६४८) | बोरिवली | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| | | | कुलवृत्तांत विक्री | ६०० |
| मुं .१६८९ | श्री.प्रभाकर दा. मराठे,(पृ.१२०) | वडाळा | हितगुज जाहिरात(सप्टेंबर ०७) | ६०० |

**सूचना**:*प्रतिष्ठान कार्यालयाकडे मनी ऑर्डर करताना संपूर्ण नांव व पत्ता देणे आवश्यक आहे.*

*with best compliments from*

# GREAT OUTDOORS

## *Business Features*

* ***Camping Equipment***
* ***Adventure sports equipment***
* ***Adventure Holidays***
* ***Tailormade bags***
* ***Servicing and repair of soft and hard luggage***

*Shop No.10, Sunshine heights,*
*Gyan Mandir Road,Opp Jain Mandir, Dadar-W, Mumbai 400028.*
*Tel. (022) 65178100 / (022) 25422072*
***email:****sanjosi@yahoo.com*
***website:****www.greatoutdoorsindia.com*

*हितगुज च्या जून २००७ च्या अंकात* ***प्रकाशझोत*** *या सदरात* ***ग्रेट आउटडोअर्स*** *चे मालक श्री.सुनील जोशी यांचा परिचय लेख प्रसिद्ध केला होता. -सह संपादक.*

# दिवाळीचा फराळ

लेखक-सौ. रोहिणी व श्री. गजानन भास्कर मराठे, (पृ.४२७)
सी ४/२, कॅशुरिना सोसायटी, बसडेपोजवळ, घाटकोपर-पूर्व, मुंबई ४०००७५;
✆: २५१६३९०७, सेल ९८६९८७५२२५.

*(गेली चौदा वर्षे 'बेस्ट' मधील नोकरीच्या काळातील 'ग.भां.' चे विनोदी, हलके फुलके किस्से, प्रसंग, यांच्या नियमितपणे येणाऱ्या दिवाळीच्या फराळाचा दिवाळीनंतरही पुरवून पुरवून आस्वाद घेत राहण्याची 'हितगुज' ने सोयिस्कर सवय लावून घेतली आहे. वाचकांनी ही दिवाळी भेट गोड मानून घ्यावी व 'ग.भां.' ना परस्पर पोहोच द्यावी ही विनंती. -संपादिका.)*

### १. ऑफिसमधील मानापमानः

'बेस्ट' मध्ये ऑफिसर झाला की त्याला 'साहेब' म्हणतात. पण कारकुनीतील वरच्या पदावर काम करणाऱ्यांना (हेड क्लार्क, चीफ क्लार्क इ.) 'मास्तर' म्हणून संबोधतात.

आमच्याबरोबर 'बरजोर' हे पारशी सहकारी होते. ते नॉनमॅट्रिक होते म्हणून ऑफिसर होऊ शकले नाहीत. पण त्यांच्या हुशारीमुळे ते चीफ क्लार्क ह्या पदापर्यंत चढले. त्यांचा पगार ज्युनियर ऑफिसरपेक्षा जास्त होता. त्यांचा पारशी कॉलनीत बंगला होता. शेअर बाजार व्यवहारात ते खूप पैसा मिळवायचे. राहणी टिपटॉप, नेहमी टाय लावणार, पण त्याना खंत होती कि ते ऑफिसर नव्हते व कोणी त्यांना 'साहेब' म्हणत नसत; तर 'मास्तर' म्हणत. ते कारकून वर्गात फार न मिसळता ऑफिसर्स बरोबर वावरत असत. अधून मधून ते ऑफिसर्स प्रसाधनगृहात जायचे. कोणी त्याबद्दल कधी आक्षेप घेत नसत.

पण एक दिवस एका डायरेक्ट रिक्रूट वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना या बाबतीत समज दिली. ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. पण नशिबाने रिटायर व्हायच्या आधी काही महिने एका ॲवॉर्डमुळे चीफ क्लार्क हे पद त्याचे नामाभिधान बदलून त्याचे 'बी ग्रेड अधिकारी' वर्गात टाकण्यात आले. ते ऑफिसर झाले.ऑर्डर हातात पडल्यावर ती फडकावत ते तात्काळ ऑफिसर्स प्रसाधनगृहात गेले. तेंव्हाचा त्यांचा आनंद काही वेगळाच व उत्कट होता. त्यांनी सर्व खात्याला फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये पार्टी दिली. बेस्ट अधिकारी म्हणून स्वतःची ओळखपत्रे छापून घेऊन ती सर्वांना वाटली. हा मानवी स्वभाव नमुना. वास्तविक त्यांची आर्थिक स्थिती क्लास वन ऑफिसरपेक्षा चांगली होती. आम्ही त्यांना म्हणत असू की का उगाच खंत बाळगता?

पण मानवी स्वभावास औषध नाही हेच खरे. लक्ष्मीपेक्षा 'मास्तर'चा 'साहेब' होणे ही त्यांची कृतकृत्यता होती!

### २.सुखद धक्का-
### (सौ.रोहिणींच्याच शब्दात)

ही गोष्ट बऱ्याच वर्षापूर्वीची आहे. तेंव्हा मी पुण्याला मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार होते. आम्ही दोघी मैत्रिणी खाजगी क्लासला जात असू. क्लास संध्याकाळी असे. व घरी येईपर्यंत काळोख होत असे. क्लासमधील दोन उनाड मुले दररोज आमच्या मागे येऊन चेष्टा, मस्करी करत असत. एके दिवशी मी धिटाईने त्यांना फटकारले आणि म्हटले, "तुम्ही आपले वर्तन सुधारा, अभ्यासात प्रगती करा व नंतर आमच्या मैत्रीची अपेक्षा करा." त्या मुलांनी नंतर आमची आगळीक करणे सोडून दिले.

नंतर २५-३० वर्षे गेली. आम्ही ती गोष्ट विसरून गेलो. दरम्यान माझा विवाह झाला व मी मुंबईस राहू लागले. एक दिवस एक गृहस्थ माझा पत्ता शोधीत घरी आले. मी त्यांना अजिबात ओळखले नाही. त्यांनी आपले नांव सांगून खुलासा केला.

" आपण एसएससी ला असताना तुम्ही मुलींनी माझी व मित्राची खरडपट्टी काढलीत. तीच माझ्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली. मी खूप अभ्यास केला, इंजिनियर झालो, आता मी अमेरिकेत एका मोठ्या कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी आहे. संसारी झालो आहे. या सर्वांचे श्रेय मुख्यत्वे तुम्ही माझी त्या वेळेला कान उघाडणी केलीत त्याला आहे."

" म्हणून मी मोठ्या खटपटी करून, तुमची शाळा, तुमचा पुण्याचा पत्ता आदि ठिकाणी जाऊन तुमचा मुंबईचा पत्ता मिळवला व कृतज्ञता व्यक्त करण्यास तुमच्याकडे आलो आहे. आपण अमेरिकेला येऊन आमचा पाहुणचार घ्यावा. आपल्या इंजिनियरिंग शिकत असलेल्या मुलास मी अमेरिकेत येण्यास सर्वतोपरी मदत करीन."

एकाद्या कटू प्रसंगाला, गोड फळे कशी येतात त्याचे हे उदाहरण आहे.

### ३.पतिपत्नींच्या भांडणात -भिन्न क्षेत्रातील बायकांचे नवऱ्यांवर फूत्कार!

काही नमुने पहा.

| | |
|---|---|
| १. पायलटची बायको- | गेलास उडत! |
| २. शिक्षकाची बायको- | मला शिकवू नका! |
| ३. रंगाऱ्याची बायको- | थोबाड रंगवीन! |
| ४. धोब्याची बायको- | चांगली धुलाई करीन! |
| ५. सुताराची बायको- | ठोकून सरळ करीन! |
| ६. तेल्याची बायको- | गेलास तेल लावत! |
| ७. न्हाव्याची बायको- | केसाने गळा कापलात |
| ८. डेंटिस्टची बायको- | दात तोडून देईन हातात! |
| ९. अभिनेत्याची बायको- | कशाला नाटके करता? |
| १०.वाण्याची बायको- | उगाच पुड्या सोडू नका! |

-०-

## नवीन उपक्रमांसाठी आवाहन-१ सी.गो.खांबेटे, सहसंपादक. मराठे परिवार कट्टा

हितगुजतर्फे स्थानिक पातळीवर नियमितपणे काही छोटे छोटे कार्यक्रम आखावेत. जसा एखादा संवाद गट असतो. ज्यात सहभागींना स्वतःला व्यक्त व्हायला (अत्रे कट्ट्याप्रमाणे), बोलायला संधी मिळेल, ज्यामुळे लोक अंकात अधिक रस घेऊ लागतील; लोकांचा एकमेकांशी परिचय व संवाद होईल. असा एखादा उपक्रम सुरु करण्याचा मानस आहे. अन्यथा वार्षिक मेळाव्याखेरीज लोक एकमेकांना भेटतच नाहीत. मेळाव्याला येणे प्रत्येकाला शक्य होतेच असे नाही. त्या दृष्टीने हा उपक्रम उपयोगी ठरेल. यातून नवीन कार्यकर्तेही तयार होतील. याबाबत वाचकांनी त्यांच्या कल्पना हितगुजकडे पाठवाव्यात.

यासाठी कृतिशील वाचक-सदस्यांनी आपल्या ideas पाठवाव्यात. जर कुणाचे घर मोठे असेल तर तिथेही असा कार्यक्रम आपण घेऊ शकतो. हॉल वगैरे घेण्याची काही गरज नाही. अशा एखाद्या स्थानिक उपक्रमाला प्रतिष्ठानचे केवळ उत्तेजन व प्रसिद्धीच नव्हे तर सक्रिय मार्गदर्शन व सहाय्यही मिळू शकेल.

*(संपादकीय भूमिका- पृ.१ वरून)*
प्राप्त करण्यासाठी - "www.chitpavans.in" या संकेत स्थळाला अवश्य भेट द्यावी. तसेच आपली प्रतिक्रिया सुद्धा नोंदवावी.

या संमेलनामध्ये चित्पावनांच्या हिताच्या काही विषयांचा उहापोह होऊन महत्त्वाचे निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे. शिवाय उपयुक्त परिसंवाद, कार्यशाळा, मुलाखती, मनोरंजन याशिवाय चहा, फराळ,भोजनाचा लाभ आहेच. शुल्क प्रतिव्यक्ती रु.२०० असून १० वर्षाखालील मुलांना निःशुल्क प्रवेश आहे. तसेच संमेलनाला जोडून आडनांवानुसार ६० च्यावर कुलसंमेलने होणार आहेत. आपण (मराठे परिवार) मात्र वैयक्तिकरीत्या संमेलनात थेट सहभाग घेणार आहोत.

सप्तचिरंजीवांमधील परशुराम हा चित्पावनांचा आद्यपुरुष आणि चिपळूणजवळच्या भूमीचा वसाहतकार. याचा पिता जमदग्नी आणि माता रेणुका. परशुराम महान पितृभक्त व शिवभक्त होता. शास्त्रविद्येत पारंगत झाल्याबद्दल शिवाने प्रसन्न होऊन त्याला परशू दिला. रेणुकेचे चित्त विचलित झाले म्हणून राग येऊन जमदग्नीने पुत्रांना तिचा वध करण्याची आज्ञा केली. पण फक्त पितृभक्त परशुरामानेच पित्याची आज्ञा पाळून आपल्या परशूने रेणुकेचा शिरच्छेद केला. पित्याने संतुष्ट होऊन परशुरामास वर मागायला सांगितले. तेव्हा त्याने 'माताच जिवंत व्हावी' असा वर मागून आपली मातृभक्ती सुद्धा सिद्ध केली.

चित्पावनांचे कुलाचार, देवी अंगात येणे, अनुनासिकांचा स्पष्ट उच्चार, अतिशय हुशार असणे, त्यांचा गौरवर्ण, निळेघारे डोळे, संस्कृत भाषेत जाणवणारी शुद्ध व स्पष्ट वाणी, शाकाहारी वृत्ती, स्वच्छताप्रियता, स्वातंत्र्यप्रेम, विद्याभिलाषा, व आक्रमकता ही त्यांची ठळक वैशिट्ये होत. स्वतंत्र हिंदुस्थानच्या लढ्यात कित्येक चित्पावनांनी प्राणांची आहुती दिली व सर्वस्वाची होळी केली त्याचा इतिहास साक्षीदार आहे.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी या चित्पावनांनी प्राण ओवाळून टाकण्याचे शौर्य दाखविले. त्या कडव्या देशाभिनानाने दिपून व संतापून इंग्रजांनी त्यांना 'कोब्रा' (Cobra-विषारी नाग) असे नामाभिधान दिले. वाटेला जाणाऱ्यास नाग दंश करतो तसे हे लोक आहेत अशी त्यांची भावना झाली असावी. योगायोगाने 'कोकणस्थ ब्राह्मण' चे संक्षिप्त रूपही 'कोब्रा'च आहे!

चित्पावन या अभिधानाचा विचार करताना बरेच तर्क मांडण्यात आले आहेत.

एका आख्यायिकेनुसार समुद्रकिनाऱ्यावर लागलेल्या १४ प्रेतांना परशुरामाने चितेमध्ये शुद्ध करुन जिवंत केले म्हणून चितापावन किंवा चित्पावन. पण चिता या शब्दाचा 'चित्'शी दूरान्वयानेही संबंध असेलसे वाटत नाही. कारण चित् म्हणजे सजीव शरीरात व विश्वातही भरून राहिलेली शक्ती. चित् शक्तीलाच पुरुष, परमात्मा, कैवल्य आणि परब्रह्म म्हणतात. या 'चित्' ने ज्यांना पावन, शुद्ध स्वरूपात जन्माला घातले ते चित्पावन ही व्युत्पत्ती अधिक मान्य होण्यासारखी आहे.

जागतिक चित्पावन महासंमेलनाच्या निमित्ताने स्फुरलेले विचारमंथन आपल्यापुढे ठेवले इतकेच. या संमेलनात आपली भेट होईलच.

त्यानंतर दोनच दिवसांनी पुणे शाखेतर्फे **मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी२००८चा प्रकाशन समारंभ** व प्रतिष्ठानचा २८वा वर्धापनदिन गतवर्षाप्रमाणे या वर्षीही **दि.२५ डिसेंबर २००७** रोजी गांधर्व महाविद्यालय सभागृह, ४१५ शनिवार पेठ, मेहूणपुरा, जोशी बंधू मंगल कार्यालयाजवळ, वर्तक आश्रमा शेजारी, पुणे ४११०३० येथे सायं. ४ ते ८ आयोजिला आहे. खास आकर्षण आहे- **१)श्री.भाऊ मराठे यांचा 'भाऊचा धक्का', २)श्री.गिरीश जाखोटिया यांचे 'मारवाडी किस्से' आणि ३)श्री.ह.मो. मराठे यांचे 'मुक्त विचारमंथन'.**

पुण्याबाहेरून संमेलनासाठी आलेल्या मराठे परिवारमंडळीनी या संधीचा लाभ घेऊन या कार्यक्रमालाही हजेरी लावावी व परस्पर परिचय दृढ करावा ही आग्रहाची विनंती आहे. हा अंक मिळेपर्यंत आपण संमेलनासाठी नोंदणी केली असल्यास आम्हाला पत्राने, फोनने किंवा ई-मेलने कळविल्यास आम्ही आपल्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूच.

शनिवार दि. १३ ऑक्टोबर २००७ रोजी ठाणे येथे गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्यासाठी उपस्थित परिवार सदस्याना मनःपूर्वक धन्यवाद. यावेळी १३ गुणवंतांनी प्रत्यक्ष हजर राहून पारितोषिके स्वीकारली. उरलेली पारितोषिके पुणे येथील २५ डिसेंबरच्या कार्यक्रमामध्ये देण्याचा मानस आहे. तरी उपस्थित राहू शकणाऱ्या सदस्यांनी तसे कळवावे.

आदरणीय श्री.विक्रमराव सावरकर यांचे हितगुजविषयक अभिप्रायवजा पत्र याच अंकांत पृ. २० वर छापले आहे.

आगामी नूतन वर्ष आपणा सर्वांना सुखसमृद्धीचे, उत्तम आरोग्याचे, आनंदाचे व मनःशांतीचे जावो ही आपणा सर्वांना शुभेच्छा.!

-०-

*(माहेरच्या आंगणात(२) पृ.१२ वरून)*
माझे दोन भाऊ, दोघी बहिणी व ईश्वरकृपेने माझे वडील असेसर्वजणच मायाळू व एकसंध आहेत याचा अभिमान वाटतो. फक्त एकच पोकळी म्हणजे माझी आई २५ डिसेंबर ७९ रोजीह्या जगाचा निरोप घेऊन गेली आणि आम्ही तीन भावंडं पोरकी झालो.

आठवणी काय आणि किती सांगायच्या ह्याला खरोखरच मर्यादा नाही. ती आपणच घालून घ्यायची असते. शेवटी जरुर म्हणावंसं वाटतं-

भाऊ माझा पाठीराखा, माझी प्रेमळ माऊली.
काय सांगू माझा पिता, दिली मायेची साऊली.
माझे औक्ष मिळो त्याला तो तर दयेचा सागर.

०००

### एखादी तरी स्मितरेषा-३

Postman:- I Have To Come 5 Miles To Deliver U This Packet
Sardar:- why did u come so far. Instead u could have posted it.

000

Wife : Do you want dinner?
Husband : Sure, what are my choices?
Wife : Yes and no.

000

Mayawati came to Lalu's House with a Goat.....
Lalu : Bhaiswa ko kyun Layi ho....??
Maya : Dikhta nahi, Goatwa hai..??
Lalu : Hum Goatwa se hi Puch raha Hun..!!

# सदस्य-संवाद

सी.गो.खांबेटे ए-१३,संपदा सो.,स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९.
✆ :२६८३६९९४;

(१)

सौ. राधा श्रीकांत मराठे (पृ-३७८)
*३/४१, जुहुदर्शन,न्यू डी.एन.नगर अंधेरी-प. मुंबई ५८*
*✆:२६३०४५२२; सेल:९८५०४३३६३१.*
१५.१०.०७

आज सकाळी डॉ.सौ.सुमेधांशी फोनवरुन बोलणे झाल्यानंतर त्यांनी सुचवल्याप्रमाणे हे लिहीत आहे.

'हितगुज'मधून मराठे कुल बांधवांसाठी ***ग्राहक हक्कांसंबंधी*** काही लिहावे असा विचार आहे. विषयाबद्दल त्यांच्या मनात काही उत्सुकता निर्माण व्हावी व त्यांनी आधी त्यांच्या काही अनुभवांबद्दल लिहावे यासाठी या पत्राने आवाहन करते.

एखादा अनुभव असाही असू शकतो की खूप प्रयत्न करूनही दिशा, जागा आणि पद्धत चुकल्यामुळे दाद घेतली जात नाही. त्या संदर्भात लगेचच थोडक्यात उत्तरही देता येईल. मात्र ते आयत्यावेळी ठरवता येईल. आधीपासून तसे जाहीर करण्याची गरज नाही.

त्याचप्रमाणे अंकासाठी काही ललित लेखनही पाठवायची इच्छा आहे. ते मेलनेच पाठवायचे की कुरीयरने पाठवायचे, ते कळवावे.

(२)

चिंतामन महादेव मराठे (पृ. २२२)
१०६/४ खटाव चाळ, डॉ. एस एस राब मार्ग, लालबाग, मुंबई ४०००१२.✆: २४१५५३१०
९-१०-२००७

सप्टेंबर २००७ चा अंक मागील आठवड्यात प्राप्त झाला. सर्व अंक वाचला. सदस्य-संवादमध्ये उज्जैनचे श्री. अभय मराठे यांचे पत्र वांचून मनांत काही शंका आल्या.

१.श्री अभयराव यांच्या पत्राप्रमाणे आपले मूळ आडनांव विद्वांस असावे असे वाटते.

२.मराठे आडनांवाची पोट आडनांवे जाईल, खांबेटे, विद्वांस, चक्रदेव जोशी, रटाटे अशी अहेत. सदर पोट आडनांवे कधी निर्माण झाली? ही आडनांवे तयार होण्यास कारणे तरी काय झाली?

या माझ्या शंकांचे कोणी जाणकार निरसन करतील काय?
चिं.म.मराठे

(३)

श्री.विक्रम सावरकर,
वास्तव्य तळवली (बारागांव) मुरबाड,जि. ठाणे ४२१४०२
२२-१०-२००७

प्रति- डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे
महोदया, अनेक उत्तम आशीर्वाद,

आज 'निवांतपणे' आपले हितगुज वाचले.

(१)अंक अतिशय देखणा आणि 'आशयघन' आहे.(२) कागद,छपाई उत्तम.संपादन उत्वृ्कष्ट आहे. अभिनंदन.

आम्ही आडनांवाने 'मराठे' नाही. परंतु स्वामी समर्थ रामदास, छत्रपति शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी आग्रहर्पूक प्रतिपादन केलेल्या आणि आचरणात आणलेल्या महाराष्ट्र धर्माचे पालन करणारे 'मराठे' हिंदूच आहोत.

मराठे कधाही राष्ट्रधर्म विसरू शकत नाहीत. आपले राष्ट्र आहे म्हणून आपण मराठे आहोत, असे मला वाटते.

आपला संपादकीय लेख चांगला आहे. 'युद्ध आमुचे'..ची समीक्षा आटोपशीर तरीहि परिपूर्ण वाटते. जागेच्या मर्यादेत उत्कृष्ट आहे. मी हा लेख एका तरुण लेखकाला वाचावयास दिला आहे. कळावे,
आपला शुभचिंतक,
विक्रम सावरकर

(४)

<ajit.marathe@gmail.com>
maratheparivar@yahoo.co.in
**5-11-2007**

I'm more then happy to see the web version of Hitguj!. Reading the new edition was really nostalgic. While in India, I used to read every edition of Hitguj.

My parents are planning to attend the Chitpavan meet this December, and have been attending the Marathe events as well. Events like this, help increase the bonding amongst us.

Sadly though, the Gen X, as we all call ourselves have not been able to be a part of such events.

This is my third year in US, and I always feel like I need to do something for 'my' people. Marathe Pratishthan appreciated my achievements in the 10th & 12th Board exams and I'm indebted to the organization.
Regards,
Ajit (Minneapolis, MN)

**Our Reply: dt.10-11-2007**

Thanks for your kind words of appreciation. Kindly let me have your full name and address to locate you precisely in our record as you know there are many "Ajits".I will try to meet you in the Maha Sammelan on 23rd December 2007, if you inform me in advance.
S G Khambete for
Maratheparivar

**Ajit's Reply: dt.10-11-2007**

My address in India is, 18 Ganganagar, Curti Ponda Goa 403401.

I'm in US currently and will not be on an India trip this December.
Ajit Marathe.

**Our open Reply to Ajit**
**1-12-2007**

Thankig you again would look too formal against your honest expression of gratitude towards Marathe Pratishthan. I, just congratulate you for your progress. I appeal to all our past scholars to look back similarly to us from whatever 'Heights' they have scaled up in life.

Those 'Marathes' i.e. Kapi Gotri Chitpavan Brahmin (Konkanastha) who have not yet become our members need to be located in our kulvrittant published in 1992 which now needs to be updated. I am a co-editor of our House Journal "HITGUJ" published quarterly from my residence in Mumbai. This issue and also the past 4 issues from No 68 to 71 are now made available also on website **'www.marathepratishthan.org'** clicking on MUKHAPATRA on the opening page. Interested parivar members are invited to contribute articles/ views for publication.

Please pass on this information to all NRI Marathe Parivar members and request them to e-mail us, stating FULL Name, DOB, and Address as also their Local (Indian) Address, Phone, etc.

You are cordially invited to become our regular member.

Wishing you a Happy New Year 2008

Regards

S G Khambete,
Mumbai phone 022-26836994
(Details available in this Journal-HITGUJ- at the foot of the cover page.

-0-

*(श्रीदत्तजन्मकथा पृ.१३वरून)*

त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. एकनाथ कथानुसंधान पुढे चालवीत म्हणतात-

ऐसे गेले बहुत दिवस।
मार्ग नाही जावयास.
न सुटे बाळपणाचा वेष।
सामर्थ्य विशेष अनुसूयेचे ।।४१

नारद पुन्हा तिघी देवभार्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून देऊन अनुसूयेला शरण जाण्यास सांगतात. त्यावेळचे त्या तिघींचे गर्वोद्गारही मोठे अर्थपूर्ण आहेत.

तरी आमुचे आम्हीच पती।
सोडवूं आपले सामर्थ्यी।
अनुसूया ते बापडी किती।
काय तिची कीर्ति आपुल्यापुढे४८

तिघींचाही अहंकार जागृत झाला आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर त्यांचा अपार विश्वास आहे, आपल्यापुढे मर्त्य अनुसूया कशी फिकी पडणार याचेही चित्रण नाथांनी स्त्री-स्वभावातील बारकावे हेरून मोठे सुरेख केले आहे. दैवी सामर्थ्याच्या पार्श्वभूमीवर मानवी स्त्रीचे सती माहात्म्य, पातिव्रत्य माहात्म्य नाथांनी येथे अधिक उठावदार केले आहे.

पार्वती, लक्ष्मी आणि सावित्री आपल्या पतीप्रमाणेच त्वरेने अत्रींच्या आश्रमात पोहोचतात. अनुसूया त्यांचे स्वागत करते. षोडषोपचारे त्यांचे पूजन करून आपले भाग्य त्यांच्या आगमनामुळे उजळल्याचे सांगते. याउलट मनातून रागावलेल्या तिघी जणी अनुसूयेशी तुटकपणे वागतात. आणि तिला बजावतात.

तिघी म्हणती आमुचे पती।
आणुनी देई शीघ्रगती।।५३।।

अनुसूयेने तेवढ्याच तत्परतेने देवपत्नींची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांचे पती आणून त्यांच्या पुढ्यात ठेवले व आपापले पती ओळखून घेण्याची त्यांना विनंती केली. पण प्रयत्न करूनही त्या तिघींपैकी एकीलाही जेव्हा आपला पती ओळखता येईना तेंव्हा त्यांची चांगलीच गाळण उडली! अनुसूयेचे अगाध सामर्थ्य जाणून त्या तिला शरण जातात आणि आपापले पती परत देण्याची तिला विनवणी करतात. त्यांचा गळून पडलेला अहंकार, त्यांची आर्जवे बघून सती अनुसूया देवांना त्यांच्या पूर्वरूपात त्यांच्या समोर प्रकट करते. अशा रितीने सतीची देवांवरही सत्ता चालते; असा सतीचा महिमा अगाध आहे!

देवही अनुसूयेच्या सतीत्वावर प्रसन्न होऊन तिला वर मागण्यास सांगतात तेंव्हा ती म्हणते, "आज सहा महिने मला तुमचा लळा लागला आहे! म्हणून, मग ते बोले करुणा वचन।

अपूर्व तुमचे दरूशन।
मज न गमे तुम्हाविण।
अर्धक्षण जाणिजे ।।६२।।

तेंव्हा तुम्ही तिघेही एकरूपाने माझ्या घरी बाळ म्हणूनच नांदावे." अनुसूयेचा हा वर लगेच मान्य होतो-

मग देवत्रयाची मूर्ती।
करकमळी झाली शीघ्रगती!
दत्तात्रय नामे ऐसी ख्याती।
तिन्ही लोकांप्रती विशेष।।६४।।

याप्रमाणे दत्तात्रयाचा जन्म होऊन हे जन्माख्यान संपते. आख्यानाची फलश्रुती सांगतांना एकनाथ महाराज म्हणतात,

ऐका जनार्दन म्हणे।
दत्तात्रय जन्मकथन।
भावे करितां श्रवण ।
मनोरथ पूर्ण श्रोत्यांचे।।६७।।

देवादिकांच्या सामर्थ्यापेक्षा अधिक सामर्थ्य मनुष्य देहांत, तपोबलाने अथवा सतीधर्म राखून पातिव्रत्याने स्त्रीला संपादिता येते; असा धार्मिक आणि नीतीचा उपदेश करण्यासाठी एकनाथांनी हे कथानक रचिलेले दिसते. त्यामुळे ते कीर्तनकारांनाही अतिशय प्रिय झालेले आहे.

(संदर्भ -श्री एकनाथमहाराज यांची गाथा. संपादक-नानामहाराज साखरे, प्रकाशकः आवटे, इंदिरा छापखाना, पुणे अभंग संख्या-३४१३).

## एक महत्त्वाची सूचना :-

चित्पावन महासंमेलनाबद्दल अनेक कुलबांधव वेळोवेळी कुतूहलपूर्वक विचारणा करत असतात. दूरवरच्या सदस्यांना नीटशी व अधिकृत माहिती मिळण्यात अडचणी येतात. अशा सर्व मराठे परिवार सदस्यांच्या सोयीसाठी व विशेषकरून ज्यांनी संमेलनासाठी नांवे नोंदविली आहेत त्याना संमेलनाचे निमंत्रक महाराष्ट्र चित्पावन संघ, (पुणे) यांनी **www.chitpavans.in** या वेबसाईटवर नुकतीच प्रसिद्ध केलेली अद्ययावत माहिती मार्गदर्शक ठरेल. संबंधितांनी अधिक माहितीसाठी 1208, Sadashiv Peth, Near Limaye Wadi, Tilak Road, Pune 411030 India **Phone :** 020 32541240; 020 24475836 **E-mail :** bapatdeva@yahoo.com या पत्यावर थेट संपर्क साधावा.- सहसंपादक.

## चित्पावन महासंमेलन २३ डिसेंबर २००७

आतार्यंत २२०००चित्पावनांची महासंमेलनासाठी नोंदणी

- o रजिस्ट्रेशनची पावती कार्यक्रमाला येताना बरोबर आणावी
- o संपूर्ण संमेलनात व्हिडिओ शूटिंग तसेच फोटोग्राफीस परवानगी नाही.
- o ज्या आडनांवांचे कुलसंमेलन नसेल त्यांचे आगाशे कॉलेजमध्ये एकत्रित संमेलन. यात करमणुकीचे कार्यक्रम होतील
- o रजिस्ट्रेशन फी रु. २०० मध्ये कुलसंमेलन,सकाळचा चहा, खिचडी, दुपारचे जेवण, चहा यांचा समावेश.पिण्याचे पाणी उपलब्ध.
- o महासंमेलनाचे रजिस्ट्रेशन केलेल्यांना कार्यशाळेत (वर्कशॉप्स) भाग घेता येईल.
- o श्रीक्षेत्र लोटे परशुराम येथून भगान परशुरामांच्या पादुकांचे पुण्यात २१ डिसेंबरला आगमन.
- o २३तारखेला दुपारी ३.३० वा. पादुकांचे पालखीतून भव्य मिरवणुकीने समारंभस्थळी आगमन (लक्ष्मी- नारायण टॉकीज ते आगाशे कॉलेज)
- o **विक्रीसाठी उपलब्ध** - संमेलनाच्या ठिकाणी चित्पावन दिनदर्शिका रु.१० आणि भगवान परशुरामांचे सोन्याचे नाणे रु. १००.
- o महासंमेलनाची स्मरणिका प्रसिद्ध होणार.स्मरणिकेत जाहिरातीसाठी संपर्कःश्री.सुशील गानू ९८८१७२४७७४
  सौ.मुक्ता टिळक ९४२२३३२९८८
- o चित्पावनांच्या वेबसाईटसाठी जाहिरात स्वीकारली जाईल navinkhate@gmail.com
- o चित्पावन व्यावसायिकांचे प्रदर्शन.प्रदर्शातीक आता फक्त ४ स्टॉल (१० बाय १०) उपलब्ध

०१.सुमंगल एंटरप्रायजेस-ज्वेलरी
०२अजित पटवर्धन - पुस्तके
०३.डॉ.शंकर अभ्यंकर -पुस्तके
०४.खडीवाले वैद्य -औषधे, पुस्तके
०५.अजित देशपांडे - म्युच्युअल फंड्स
०६.प्रकृती आयुर्वेद हेल्थ रिसॉर्ट,
०७.फिल्टर इंडिया-ऑईल क्लीनिंग सिस्टीम्स
०८.अजय गोडबोले.पाली रियल इस्टेट
०९.भागवत ब्रदर्स, पुणे
१०.नेहल ट्रॅव्हल्स
११.सायनर्जी फूडस-पाम तेल
१२.केशवलक्ष्मी प्रसाधने
१३.संजय रानडे, पुणे- क्लासेस
१४.साझ म्युझिक, मुंबई
१५.स्नेहल असोशिएट्स,ज्वेलरी
१६.डॉ. रविन् थत्ते
१७.मोहन गोखले
१८.पॅपिलॉन ब्यूटी सलून-ब्रायडल मेकप
१९.भावबंध, मुंबई- मॅरेज ब्यूरो.

-o-









३. कै. श्रीकृष्ण मनोहर विद्वांस

४. कै.इंदिराबाई वामन मराठे

५. कै. आरती विनायक खांबेटे

*(सभासदवृत्त-सहवेदना पृ.२ वरून)*

३. दादर येथील सदस्य **श्रीवृष्ण मनोहर विद्वांस** (पृ.८६४)यांचे दि.१९-१०-२००७ रोजी ८४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. मुंबई महागर पालिकेमधून ऑफिसर म्हणून निवृत्त झाले.त्यांच्या मागे पुत्र संजय व कन्या सौ.सीमा केळकर आणि नातवंडे असा परिवार आहे.

४. ठाणे येथील सदस्य श्री.सुरेश वामन मराठे यांच्या मातोश्री **श्रीमती इंदिराबाई** (वय ८०)यांचे **दि.**२४-१०-२००७ रोजा वृद्धापकाळमुळे निधन झाले. त्यांच्या मागे दोन पुत्र सुभाष व सुरेश, सुना, विवाहित कन्या कुसुम पटवर्धन व सुनंदा कोतवाल आणि नातवंडे असा परिवार आहे. कै.इंदिराबाईविषयी स्मृति लेख याच अंकात पृ.६ वर पहा.

५. विलेपार्ले येथील श्री विनायक(सुधीर) कृष्णाजी खांबेटे (पृ.६९४) यांच्या पत्नी **सौ. आरती** वय (४८)यांचे दि. १३-११-२००७ रोजी कर्करोगाने निधन झाले.त्यांच्या मागे पती विनायक व पुत्र अद्वैत व सुकृत असा परिवार आहे.

६. पुणे येथील सदस्य **विनायक शंकर खांबेट** (पृ.६७६) यांचे दि. २७-१०-२००७ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी ह्रदयविकाराच्या तीव्र आघाताने निधन झाले. कै. विनायक (उर्फ बाळ) हे टेल्को कंपनीमध्ये सिव्हिल इंजिनियर म्हणून प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले होते. त्यांच्या मागे पत्नी वैशाली, पुत्र किरण व कन्या सौ. विनया केळकर आणि कुटुंबीय तसेच शरद व प्रकाश हे दोन बंधू व सौ.शशिकला (पाटोळे) व सौ.आशा (खरे) या बहिणी असा परिवार आहे. त्यांचे वडिल कै.शंकर मोरेश्वर हे स्वातंत्र्यसैनिक व निष्ठावंत गांधीवादी म्हणून प्रसिद्ध होते.

७. पुणे येथील सदस्य व पुणे दैनंदिनीचे मुद्रक **प्रमोद विष्णू मराठे** (पृ.५१३)यांचे दि.२७-९-२००७ रोजी कॅन्सरने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी अर्चना व रोहन आणि रोहित हे दोन पुत्र आहेत. कै. प्रमोद यांच्यावरील स्मृतिलेख याच अंकात पृ.१२ वर पहा.

वरील सर्व दिवंगतांच्या कुटुंबियांच्या दु:खात प्रतिष्ठान सहभागी आहे.-०-

# धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे

लेखक-श्री.सी.गो.खांबेटे(पृ.६७६)-अंधेरी. F:२६८३६९९४;

('संस्कृत गीतरामायण' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला उपस्थित राहण्याच्या निमित्ताने श्री.खांबेटे यांनी कुरुक्षेत्र या पवित्र भूमीला गेल्या वर्षी भेट दिली होती तो वृत्तांत डिसेंबर २००६ च्या हितगुजमध्ये आला आहे. यात्रा कंपन्यांच्या पर्यटनस्थळांच्या यादीत अभावानेच दिसणाऱ्या या पवित्र भूमीचे महत्त्व आपल्या कुलबांधवाना माहिती करून देणारा हा लेख -संपादिका)

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवाः।
मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ।।

श्रीमद्भगवद्गीतेच्या पहिल्याच श्लोकात उल्लेखिलेले हे कुरुक्षेत्र कौरव-पांडवांमधील युद्धाची भूमी म्हणून सर्वज्ञात असले तरी मराठी पर्यटकांच्या दृष्टीने काहीसे दुर्लक्षित राहिले आहे असे दिसते.

या पुण्यक्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. याला समंतपंचक किंवा ब्रह्माची उत्तर वेदी या नांवाने सुद्धा ओळखले जाते. भीष्म पितामह व परशुराम यांच्यात घोर संग्राम येथेच झाला होता. भगवान वेदव्यास यांनी पंचमवेद महाभारत या ग्रंथाची रचनासुद्धा येथेच केली होती. श्रीकृष्णाने क्षत्रिय वीर अर्जुनाला उद्देशून जगाच्या कल्याणासाठी भगवद्गीतेचा उपदेश केला तोही येथेच.

सातव्या शतकात हर्षवर्धनाने येथील थानेसर (स्थानेश्वर) या ठिकाणी आपली राजधानी केली होती. येथील स्थानेश्वर महादेव मंदीर देखणे आहे. त्या नंतरच्या अनेक विदेशी आक्रमणांमुळे येथील संस्कृती नष्टप्राय झाली. अलिकडच्या काळात म्हणजे १७५७ सालचे मराठे व मोंगल यांमधील पानिपतचे ऐतिहासिक युद्ध येथेच लढले गेले. मराठे हरले पण हे कुरुक्षेत्र मात्र अमर राहिले.

प्राचीन काळातील कुरुक्षेत्र हे केवळ एकादे पवित्र सरोवर, एकादे शहर नसून ते अनेक तीर्थस्थानांनी परिपूर्ण असे भूक्षेत्र होते. महाराज मनूच्या अनुसार प्राचीन पवित्र सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्या मधील हे तीर्थक्षेत्र अंबाल्यापासून दक्षिणेस व दिल्लीपासून उत्तरेस एकूण १०० मैल व्याप्तीच्या प्रदेशात आहे.

राजा कुरूने या क्षेत्राला आध्यात्मिक ज्ञान, विज्ञान व संस्कृतीचे महान क्षेत्र बनविण्याचा निश्चय केला होता. त्यासाठी त्याने घोर तपश्चर्या केली व त्याने भगवान शंकराकडून वृष व मयराजाकडून रेडा प्राप्त केला. तो येथे सुवर्ण रथावर बसून आला व त्या रथाच्या सोन्याचाच नांगर आपल्या हाताने येथील विस्तीर्ण भूमीवर चालवून ही सर्व भूमी कृषियोग्य करावयास सुरुवात केली. त्याच्या या घोर प्रयत्नाचा हेतू इंद्रदेवाने विचारला असता कुरू उत्तरला, "येथे कष्ट करताना मरणारा पुण्यात्मा पापरहित होऊन स्वर्गाला जाईल." इंद्रदेवाने यावर उपहासाने हसून दुर्लक्ष केले. असे कित्येक दिवस चालू होते. इंद्राने अखेर देवतांना बोलावून कुरूची इच्छा त्यांना सांगितली. यावर देवतांनी इंद्राला राजर्षि कुरूला योग्य असे वरदान देण्यासाठी आदेश दिला. "या ठिकाणी जे पशु पक्षी आणि मनुष्य मरतील किंवा युद्धात मारले जातील ते स्वर्गाचे रहिवासी होतील", हा वर इंद्राने कुरू राजाला देऊन त्याच्या या घोर तपाचे फल दिले.

या कुरुक्षेत्राचा महिमाच असा की जो कोणी-
कुरुक्षेत्रं गमिष्यामि कुरुक्षेत्रे वसाम्यहम्।
अप्येकवारमुच्चार्य सर्वपापैः प्रमुच्यते।।

"मी कुरुक्षेत्राला जाईन आणि तेथे निवास करीन असे केवळ एकदा म्हणेल तो सुद्धा सर्व पापांपासून मुक्त होईल. यामुळेच कौरव पांडवांनी युद्धासाठी आपल्या पूर्वजांनी पावन केलेली ही भूमी निवडली.

६५८७० हत्ती, २१८७० रथ, १०९३५० पायदळ आणि ६५६०० घोडदळ मिळून एक अक्षौहिणीचे सैन्य होते. या महायुद्धात दोन्ही बाजूंचे मिळून एकूण १८ अक्षौहिणी म्हणजे सुमारे ४० लाखांच्यावर सैनिकांनी भाग घेतला. यांच्यासाठी एक विशाल निर्जन भूमी, विपुल पाणी व इंधनाची व्यवस्था आवश्यक होती.

कित्येक ग्रंथकार आणि इतिहासकारांच्या मते कुरुक्षेत्राला महासमरासाठी निवडण्याचे मुख्य कारण ह्याला धर्मक्षेत्र मानले गेले हे आहे. शतपथ ब्राह्मणात कुरुक्षेत्राला अग्नि, सोम, विष्णू आणि वैश्वदेवांची यज्ञभूमी म्हटले आहे. ऐतरेय ब्राह्मणानुसार स्वर्गाची कामना करणारे देव कुरुक्षेत्रात यज्ञाचे संपादन करून स्वर्ग प्राप्त करत होते. कुरुक्षेत्राच्या धार्मिक महत्त्वाच्या बाबतीत महाभारत व पुराणात असा

उल्लेख मिळतो की वेदमंत्रांचा उच्चार सर्वात आधी इथेच झाला. भगवान श्रीकृष्णाप्रमाणेच प्रभू रामचंद्र सुद्धा येथे सूर्यग्रहणात आले होते असा उल्लेख आहे.

कुरुक्षेत्रात एकूण ३६० तीर्थे आहेत. त्यांतील काही प्रमुख तीर्थे खालीलप्रमाणे-

१. संनिहित तीर्थ-

सन्निहित्यामुपस्पृश्य राहुग्रस्ते दिवाकरे।
अश्वमेधशतं तेन दृष्टं भवति शाश्वये।



ग्रहणाच्या दिवशी सूर्य राहूद्वारा ग्रस्त झाला असता सन्निहित तीर्थात स्नान केल्याने शंभर अश्वमेधांचे पुण्य मिळते. नारदपुराणानुसार हे सरोवर ब्रह्माने निर्माण केले आहे. पृथ्वीतलावरील सर्व तीर्थे नद्या, कुंडे यांचे पवित्र जल दर अमावास्येला येथे येते. येथे भक्त धृव आणि नारायण यांच्या, पूर्व बाजूला खूप उंचशा मारुतीची आणि सिंहवाहिनी अष्टभुजा दुर्गादेवीची अशा सुंदर मूर्ती आहेत.

दधिची ऋषींनी देवतांच्या विजयासाठी अस्थिदान येथेच केला. युधिष्ठिराने महाभारतानंतर आपल्या र्स बांधवांचे तर्पण, पिंडदान येथेच केल्याचा उल्लेख आहे.

२. ब्रह्मसरोवर- हे प्राचीन भव्य सरोवर आहे. कुरुक्षेत्र विकास बोर्डाने याचे आधुनिक नवनिर्माण करून ३६०० फूट बाय १२००फूट असे आटोपशीर बनविले आहे.




येथे एकाच वेळी (सूर्यग्रहणात) पाच लाख यात्रेकरू स्नान करू शकतात अशी व्यवस्था केलेली आहे.स्त्रियांसाठी वेगळी स्नानाची सोय आहे. सरोवराच्या मधोमध रम्य असे सर्वेश्वर महादेव मंदिर आहे. सरोवराचे नूतनीकरण पूर्ण झाल्यावर हे जगातील सर्वात मोठे पक्क्या घाटांचे सरोवर ठरेल.

या सरोवराच्या मध्यभागात पुरुषोत्तमपुरा नावाच्या विस्तीर्ण भूभागावरील एक मोठे मंदिर मुगल सम्राट औरंगजेब याने तोडून तेथे एक किल्ला बांधून सैन्य ठेवले होते. स्नानाला येणाऱ्या यात्रेकरूंकडून हे सैनिक यात्रा कर वसूल करत व प्रसंगी त्यांचेवर गोळ्या झाडत असत (संदर्भ- इंपिरियल गॅझेटियर्स ऑफ पंजाब).

४. सर्वेश्वर महादेव मंदीर व
५. गोरखनाथ मंदिर ही दोन प्राचीन मंदिरे व
६. श्रीकृष्ण म्यूझियम ही स्थाने अवश्य पाहावीत.
६. जयराम विद्यापीठ- हे ब्रह्म सरोवराच्या समोर आणि गीता भवन व गौडिया मठाच्या मधे मोठे सुंदर मंदिर आहे. यामध्ये वेदांची स्थापना केली आहे. येथे संस्कृत विद्यालय आहे. मंदिरात दशावताराची सुंदर चित्रे कोरलेली आहेत.

७. गीता भवन- १९२१ साली रीवाच्या महाराजांना ही देखणी इमारत बांधली. येथे श्रीकृष्ण भगवान, शंकर व दुर्गेच्या सुंदर भव्य व आकर्षक मूर्ती आहेत.

८. बिरला मंदिर- हे श्री जुगल किशोर बिरला यांनी १९५२ साली बांधले. याच्या सर्व भिंतीवर भगवद्गीतेच्या १८अध्यायांतील सर्व श्लोक सुबक अक्षरांत कोरुन ठेवले आहेत.



९. भद्रकाली मंदिर- हे हरियानातील एकमेव सिद्धपीठ (एकूण ५१ पैकी )आहे. श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतोपदेश करण्यापूर्वी पांडवांनी विजयाची कामना करण्यासाठी माँ कालीचे पूजन केले होते. त्यावेळी श्रीकृष्णाच्या आदेशानुसार अर्जुनाने दुर्गा मातेला प्रसन्न करण्यासाठी हे शत्रुनाशकर म्हणून प्रसिद्ध स्तोत्र म्हटले होते. हे स्तोत्र महाभारताच्या भीष्मपर्वात २८ श्लोकांमध्ये व्यासानी रचले आहे. याच्या शेवटी -

यतो धर्मस्ततः कृष्णो यतःकृष्णस्ततो जयः। हे सुप्रसिद्ध वचन असून लगेच पुढच्या ओळीमध्ये- धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे किमर्कुत संजय या प्रश्नाने गीतेला सुरुवात झाली आहे. गीतेच्या संदर्भामध्ये हे इतके महत्त्वाचे स्तोत्र असूनही काहीसे दुर्लक्षित राहिले आहे. या मंदिरामधील भितीवर हे संपूर्ण स्तोत्र सुवाच्यपणे लिहिलेले आहे. सदस्यांच्या माहितीसाठी हे स्तोत्र याच अंकात पृ. ५ वर दिले आहे.

१०. स्थानेश्वर महादेव मंदिर -

अकामो वा सकामो वा प्रविष्टः स्थाणुमंदिरम्
वियुक्तः पातकैः घोरैः प्राप्नोति परमं पदम्।

सहेतुक वा निर्हेतुकपणे या मंदिरात कोणीही प्रवेश केला तरी तो महान पातकांपासून मुक्त होतो. महाभारत युद्धाच्या आधी श्रीकृष्णाने सर्व पांडवांसह येथे स्थाणू पूजा केली होती.

या प्रमुख तीर्थस्थानांखेरीज सरस्वती नदीच्या तीरावर कुबेराने यज्ञ केला तेथील कुबेरतीर्थ, अर्जुनाने बाणाच्या सहाय्याने पाणी आणून भीष्माचार्यांची तृष्णा शमविली ती बाणगंगा, दानवीर कर्णाने युद्धकाळात ब्राह्मणाना ज्या ठिकाणी दान केले तो कर्णाचा खेडा, जेथे तर्पण केल्यावर शंभर पिढ्यांपर्यंत पितरांना तृप्ती मिळते ते आपगा तीर्थ, जेथे विष्णूच्या नाभीतून ब्रह्माची उत्पत्ती झाली ते नाभी कमळ मंदिर, ज्योतीसर तीर्थ, पेहवा (पृथोदक) तीर्थ, जनमेजय राजाने जेथे सर्पयज्ञ केला ते सर्पदमन तीर्थ, अभिमन्यूचे चक्रव्यूह, युधिष्ठिराने मागितलेल्या पाच गांवापैकी एक कपिस्थल ( आताचा कैथल जिल्हा), दुर्योधन लपून बसला होता ते द्वैपायन( पाराशर) तीर्थ, विष्णूने वराह अवतार धारण केला तेथील वराह तीर्थ अशी अनेक पौराणिक संदर्भ असलेली स्थाने या कुरुक्षेत्राच्या परिसरात जागोजागी दाखविली जातात. याशिवाय येथे काम्यक, आदित्य, व्यास, फल्गू (फलकी),सूर्य , मधु व शीत ही सात पवित्रवने, आणि सरस्वति, वैतरणी, आपगा, मधुस्त्रावा, कौशिकी, दूषद्धती आणि हिरण्यवती या सात पवित्र नद्या व चंद्र, विष्णू, रुद्र व देवी या नांवांच्या चार पवित्र विहिरीही आहेत.

अशा या दुर्लक्षित कुरुक्षेत्राला यात्रेच्या निमित्ताने प्रत्येकाने एकदा तरी अवश्य भेट द्यावी.

-०-

महाराष्ट्रीय लोकांमध्ये आणि विशेषत:
समस्त मराठे कुटुंबियांमध्ये बांधकाम क्षेत्रामधील
एकमेव विश्वसनीय नाव

# निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्

संचालक - **श्री. अजित श्रीराम मराठे**



नेरळ स्टेशनपासून फक्त१ कि.मी. अंतरावर,

**उल्हास नदीकिनारी वसलेली बंगलो स्कीम**

आमचे अन्य प्रोजेक्टस्
- निर्माण माथेरान व्हॅली नेरळ - बंगलो स्कीम
- निर्माण नगरी नेरळ - मिनी टाऊनशिप
- ऋतुनिर्माण नेरळ - बंगलो स्कीम
- खंडाळा - निर्माण हायलॅन्ड बंगलो स्कीम
- मधुसुमित्रा निर्माण - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम
- निर्माण लेक व्ह्यू - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम

आमचे मुंबईतील प्रोजेक्टस्
- महालक्ष्मी
- जोगेश्वरी,
- गोरेगाव,
- मालाड,
- कांदिवली,
- विलेपार्ले (पूर्व) आणि विलेपार्ले (पश्चिम) स्टेशन समोर

NIRMAN GROUP OF COMPANIES
ISO 9001:2000 Certified
• Builders • Developers • Consultants

हेड ऑफिस : 14, न्यायसागर अपार्टमेंट, नागरदास रोड, चिनॉय कॉलेज जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - 69.
संपर्क : 2683 3131 (6 Lines) साईट ऑफिस : नेरळ (सेंट्रल रेल्वे मुंबई-कर्जत मेन लाईन),
दूरध्वनी - 02148-238251 / 02148-236696

BOOK POST

If udelevered,
please return to

सहायक संपादक,
हितगुज
श्री.सीताराम गो.खांबेटे
ए१३,संपदा सोसायटी
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी-पूर्व,
मुंबई ४०००६९

त्रैमासिक हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता: सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे,ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९; दूरध्वनी: २६८३६९९४; मोबाईल : ९८३३५६४२६८.ईमेल (1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in वेबसाईट : www.marathepratishthan.org